बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड शुक्रवार,दि.२५ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक८२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


# ८५ विमानं बॉम्बने उडवण्याची धमकी

देशात नेमकं चाललंय काय ▸ दिल्ली पोलीस अलर्ट मोडवर ▸ प्रवाशी होवू लागले भयभित?

आंतरराष्ट्रीय विमानांना ही धमकी

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

देशात विमान कंपन्यांना येणाऱ्या धमक्या पाहून नेमकं चाललं तरी काय आहे? असा प्रश्न कुणालाही पडेल. कारण आता एक नाही दोन नाही ८५ विमानं बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. यामध्ये इंडिगोची २० विमानं, एअर इंडियाची २०, विस्ताराची २० आणि अकासा एअरलाइन्सची २५ अशी ८५ विमानं उडवून देण्यात येतील अशी धमकी देण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मागच्या आठ दिवसात ९० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विमानं बॉम्बने उडवण्याची धमकी आली आहे. यानंतर दिल्ली पोलीस अलर्ट मोडवर आहेत.अकासा, एअर इंडिया, इंडिगो, विस्तारा या विमान कंपनीची विमानं बॉम्बने उडवू अशी धमकी देण्यात आली आहे. या धमकी प्रकरणात आत्तापर्यंत आठ वेगवेगळ्या ऋखठ दाखल करण्यात आल्या आहेत. दिल्लीहून देशातल्या विविध ठिकाणी जाणाऱ्या आणि आंतरराष्ट्रीय विमानांना ही धमकी देण्यात आली आहे. इंडिया टुडेने हे वृत्त दिलं आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार धमक्यांचे हे संदेश सुरुवातीला एक्स या मायक्रोब्लॉगिंग साईटवर देण्यात आले. ते सुरुवातीला तपास अधिकाऱ्यांनी फेटाळले. यातलं पहिलं प्रकरण १६ ऑक्टोबरला समोर आलं होतं. मात्र आता ८५ विमानं उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. त्यामुळे तपास यंत्रणा अलर्ट मोडवर आहेत.




### ● १६ ऑक्टोबरला काय घडलं?

१६ ऑक्टोबरला अकासा एअरलाइनचं विमान हे बॉम्बने उडवण्यात येईल अशी धमकी एक्सवरुन देण्यात आली होती. १८० प्रवासी या विमानात बसले होते. ही धमकी आल्यानंतर हे विमान पुन्हा दिल्ली विमानतळावर उतरवण्यात आलं होतं. तसंच पोलिसांनी एक्सकडे पत्र लिहून ही धमकी कुठल्या अकाऊंटवरुन आली त्याचे तपशील मागितले होते.

### ● दिल्लीचा सायबर सेल विभाग दक्ष

दिल्ली पोलिसांचा साबयर सेल विभाग सध्या या प्रकारच्या घटनांवर लक्ष ठेवून आहे. एक्स आणि सोशल मीडियाचा वापर करुन विमानं उडवण्याच्या धमक्या देण्यात येत आहेत. एका आठवड्यात १७० हून अधिक विमानं उडवू, त्या विमानांमध्ये स्फोट करु अशा धमक्या आल्या आहेत. एखाद्या एक्स अकाऊंटवरुन धमक्या येत तर नाहीत ना? याकडे डोळ्यांत तेल घालून सायबर सेल विभाग लक्ष देत आहे. या धमक्या का देण्यात येत आहेत? कुणाकडून देण्यात येत आहेत याचे तपशील अद्याप समजू शकलेले नाहीत.




# शक्ती प्रदर्शन न करता अर्ज दाखल

**रणधुमाळी:** धनंजय मुंडे यांनी केला अर्ज दाखल

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

कोणतेही शक्ती प्रदर्शन न करता, गाजावाजा न करता महाराष्ट्राचे कृषिमंत्री नामदार धनंजय मुंडे यांनी आज दिनांक २४ ऑक्टोबर रोजी २३३ परळी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या वतीने आज आपला उमेदवारी अर्ज परळी उपविभागीय कार्यालयात दाखल केला. यावेळी भाजपा नेत्या आमदार पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ.प्रीतम ताई मुंडे यांच्या सह लाडक्या बहिणींची प्रामुख्याने उपस्थित होत्या.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत मी पंकजाताई मुंडे यांचा सुचक होतो. या वेळेला विधानसभा निवडणुकीत माझ्यासाठी पंकजाताई व डॉक्टर प्रीतम ताई उमेदवारी अर्ज दाखल करताना सोबत आहेत. माझा परळी विधानसभा मतदारसंघातील मायबाप जनतेवर विश्वास असून जनतेचा माझ्यावर विश्वास आहे. त्यामुळे माझा विजय कोणीही रोखू शकत नाही.

पुढे बोलताना ते म्हणाले की २०१९ च्या निवडणुकीत तुम्ही जनतेला जाहीरनामाच्या माध्यमातून जे वचने व आश्वासने दिली होती ती सर्व आश्वासने पूर्ण केले आहेत परळी विधानसभा मतदारसंघाचा विकास करणे हेच माझे अंतिम ध्येय असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. उमेदवारी अर्ज दाखल करताना परळी विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी ▸ पान २ वर...

# माजलगावमध्ये होणार रस्सीखेच!

**पडघम:** बाबरी मुंडेंनी अर्ज केला दाखल



माजलगाव पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघात गुरुवारी राजकीय गरमागरमीचा दिवस ठरला. गोपीनाथ गडाच्या पायथ्याशी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेत हजारो युवकांसोबत शक्ती प्रदर्शन करत फुलचंद उर्फ बाबरी मुंडे यांनी गुरुवारी दुपारी गुरुपुष्यामृत मुहूर्तावर माजलगाव येथे अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.याप्रसंगी 'बाबरीसेठ तूम आगे बढो हम तुम्हारे साथ हैं' च्या घोषणांनी माजलगाव परिसर ढवळून निघाला होता.

गुरुवारी सकाळी पाच वाजता परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करत फुलचंद उर्फ बाबरी मुंडे यांनी गोपीनाथ गडावरील लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या समाधीचे दर्शन घेतले.श्रीक्षेत्र बाभळगाव हनुमान मंदिर , माता आंबा चोंडी देवी दर्शन धारूर, श्रीक्षेत्र चारदरी हनुमान मंदिर, संत श्रेष्ठ भगवान बाबा दर्शन कोठरबन , श्रीक्षेत्र चिंचवन, मकृध्वज मंदिर दर्शन, चौंडेश्वरी मंदिर वडवणी दर्शन, राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे हरिश्चंद्र मंदिर दर्शन, पात्रुड येथे हजरत ख्वाजा मगदूम अन्सारी दर्गा, शुक्लतिर्थ निमगाव येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर , खरात आडगाव येथे श्री सावता ▸ पान २ वर...

# युवासेना पदाधिकाऱ्यांची यादी जाहीर!

**निवड:** जिल्हाप्रमुख जगताप, मुळूकांकडून अभिनंदन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशिर्वादाने व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व संसदरत्न खासदार मा. डॉ. श्रीकांतजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली युवसेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या आदेशानुसार आणि जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप, सचिन भैय्या



मुळूक तसेच युवसेना मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे यांच्या विनंतीनुसार काल दि. २४ ऑक्टोबर रोजी सायं ६.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना पक्षाच्या युवासेना बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीची यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये सागर विजय बहिर विभागीय निरीक्षक बीड लोकसभा,


किशोर भास्करराव गिराम जिल्हाध्यक्ष बीड गेवराई विधानसभा, रविराज प्रकाशराव बडे जिल्हाध्यक्ष माजलगाव, आष्टी, पाटोदा, इंद्रजित पांडूरंग बाभुळगांवकर जिल्हा उपाध्यक्ष बीड विधानसभा शिरूर तालुका, प्रदिप रामहारी जोगदंड जिल्हा उपाध्यक्ष बीड विधानसभा ग्रामीण,

# वाळू माफयांनी ग्रामस्थांची झोप उडवली

**दुर्लक्ष : माने, अबुज छापू लागले माल**

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या गावांतून चहुबाजूने गंगेच्या पात्राने व्यापले असल्यामुळे तालुक्यात मुबलक वाळू असल्या कारणाने सर्वच वाळू तस्कर निर्माण झाले आहेत. या वाळू तस्करांना गंगेचीच काय तर नदी, ओढयाची वाळू देखील पुरेनाशी झाली आहे,गोदावरी नदी



पोखरून अक्षरच्या चिंधड्या चिंधड्या केल्या जात आहेत. गेवराईचे तहसीलदार संदिप खोमणे साहेब तपोनिमगाव गोदावरी नदी पात्रातून किणीच्या साह्याने दिवसा रात्री खुले वाळू उपसा होत आहे. सध्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने ▸ पान २ वर...

# सरन्यायाधीश म्हणून सजीव खन्ना

**निवड:** राष्ट्रपतींनी खन्ना यांच्या नावावर शिक्कामोर्तब

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारताचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश सजीव खन्ना यांची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय विधी व न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी ही घोषणा केली. मावळते सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी मागच्या आठवड्यातच संजीव खन्ना यांचे नाव सुचविले होते. त्यानंतर आता राष्ट्रपतींनी खन्ना यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून ११ नोव्हेंबर रोजी ते सरन्यायाधीश पदाची शपथ घेतील. चंद्रचूड यांच्यानंतर संजीव खन्ना हे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. त्यांच्या काळात त्यांनी काही ऐतिहासिक आणि महत्त्वाचे निकाल घेतले आहेत. मावळते सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी मागच्या आठवड्यातच संजीव खन्ना यांचे




नाव सुचविले होते. त्यानंतर आता राष्ट्रपतींनी खन्ना यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून ११ नोव्हेंबर रोजी ते सरन्यायाधीश पदाची शपथ घेतील. याच दिवशी विद्यमान सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांचा कालावधी संपत आहे.संजीव खन्ना यांचा जन्म १४ मे १९६० रोजी झाला असून सुमारे चार दशकाहून अधिक काळ ते न्यायिक क्षेत्रात काम करत आहेत. १९८३ साली दिल्ली बार कौन्सिलचे सदस्य झाल्यानंतर त्यांनी जिल्हा न्यायालय तीस हजारी कोर्ट नंतर दिल्ली उच्च न्यायालय आणि ▸ पान २ वर...

**बोंबला** सर्वपक्षीय 'पॉलिटिकल नेपोटिझम'ला उत

# पक्षांकडून घराणेशाहीला झुकते माप?

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यंदा विविध पक्षांनी आपापल्या उमेदवार यादीत घराणेशाहीला थोड्याबहोत प्रमाणात स्थान दिल्याचे दिसत आहे. स्वतःला पार्टी विथ डिफरन्स आणि इतरांना परिवारवादी पक्ष म्हणणाऱ्या भाजपानेही यंदा घराणेशाहीला प्राधान्य दिल्याचे दिसत आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर पुर्वीपासूनच घराणेशाहीचा आरोप होत आला आहे. आज जाहीर केलेल्या यादीतही त्याची प्रचिती आलेली पाहायला मिळाली.राष्ट्रवादीने आपल्या पहिल्या यादीत कर्जत जामखेड मतदारसंघासाठी रोहित पवार, बेलापूरसाठी संदीप नाईक, मुक्ताईनगरसाठी रोहिणी खडसे, अहेरीमधून भाग्यश्री आत्राम, बारामतीसाठी युगेंद्र पवार, पारनेरमध्ये रानी लंके आणि तासगाव–कवठे महांकाळ मतदारसंघात रोहित आर. आर. पाटील यांना उमेदवारी दिली आहे.



### पवार घराण्याचा आणखी एक सदस्य राजकारणात

शरद पवार यांच्या घरातून युगेंद्र पवार यांच्या रुपाने नवीन सदस्य आता निवडणुकीच्या रिंगणात उतरला आहे. याआधी अजित पवार, सुप्रिया सुळे, रोहित पवार हे राजकारणात सक्रिय आहेत. माजी मंत्री गणेश नाईक यांचे चिरंजीव संदीप नाईक यांनी बंडखोरी करत बेलापूरमधून तुतारीच्या चिन्हावर लढण्याची तयारी केली आहे. अजित पवार गटाचे मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांची लेक भाग्यश्री आत्राम ही आपल्या वडिलांविरोधात निवडणूक लढवित आहे. पारनेरमध्ये विद्यमान खासदार निलेश लंके यांची पत्नी रानी लंके निवडणुकीसाठी उभी आहे. तर राज्याचे माजी गृहमंत्री आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील हे त्यांच्या तासगाव– कवठे महांकाळ या पांरपरिक मतदारसंघात निवडणुकीसाठी उभे राहिले आहेत. माजी मंत्री एकनाथ खडसे यांची मुलगी रोहिणी खडसे यांना जळगावच्या मुक्ताई नगरमधून तिकीट देण्यात आले आहे.




## भारत–चीनमध्ये गस्त करार

भारत आणि चीनमध्ये गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेला सीमावाद आता अखेर संपुष्टात आला आहे. चीनने भारताशी ‘गस्त करार’ करण्यास सहमती दर्शवली आहे. या गस्त करारानंतर सीमेवर दोन्ही देशांमध्ये पुन्हा एकदा विश्वासाचे वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे. एवढेच नव्हे तर या करारावर मंगळवारी दोन्ही देशांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत, असे सांगण्यात येते. भारत आणि चीनमध्ये सैन्य मागे घेण्याबाबत आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) गस्त घालण्याबाबतचा हा करार आहे. यामुळे २०२०पासून सुरू झालेला भारत–चीन सीमावाद संपण्यास मदत होणार आहे. या करारामुळे डेपसांग आणि डेमचोकमध्ये दोन्ही देशांची गस्त सुरू होईल. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर २०२० पूर्वीप्रमाणे शांतता प्रस्थापित होईल. दोन्ही देशांचे सैन्य भारत–चीन सीमेवरून माघार घेतील आणि एलएसीवरून २०२० साली सुरू झालेला वाद संपुष्टात येईल, अशी अपेक्षा दोन्ही देशांकडून व्यक्त केली जात आहे.१६ व्या ब्रिक्स परिषदेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे रशिया दौऱ्यासाठी रवाना झाले आहेत. रशिया आणि चीनचे संबंध खूप चांगले असल्यामुळे चीन आणि भारत यांच्यातील तणाव कमी करण्यासाठी रशियाचे अध्यक्ष पुतिन यांनी महत्त्वाची भूमिका बजाविण्याचे त्याच्या एकूण परराष्ट्रविषयक धोरणावरून दिसून येत आहे. त्यातून अनेक चांगल्या बाबी घडून येताना दिसत आहेत. मात्र, भारत आणि चीन यांच्यातील तणावपूर्ण स्थिती ही अलीकडची बाब नाही. दोन्ही देशांमधील सीमेवरील तणाव आणि युद्धाच्या पार्श्वभूमीला तसा खूप जुना इतिहास आहे. १९६२ चे भारत–चीन युद्ध हे आज इतिहासातील पुस्तकाचा विषय नाही, तर भारतीय आणि चीनमधील नागरिकांमध्ये या युद्धानंतर विश्वासाचे नाते निर्माण झाले नव्हते. २०२०मध्ये पूर्व लडाखमध्ये भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये हिंसक संघर्ष झाला होता, हा अलीकडचा प्रसंग. ज्यात २० भारतीय जवान शहीद झाले होते, तर अनेक चिनी सैनिकांचाही यात मृत्यू झाला होता. तेव्हापासून दोन्ही देशांमध्ये तणावपूर्ण स्थिती आहे. मात्र दोन्ही देशांतर्गत असलेल्या व्यापाराला त्याची झळ पोहोचली होती. २०२३पर्यंत दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार १३६ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला होता. चीन आणि भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांची सीमावर्ती भागातील प्रश्नांवर गेल्या काही महिन्यांपासून बैठकांचा सिलसिला सुरू होता, पण त्यात समाधानकारक मार्ग निघू शकला नव्हता, ही वस्तुस्थिती मान्य करायला हवी. परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, इथपर्यंत पोहोचणे ही मोठी गोष्ट नव्हती आणि ती इतक्या सहजासहजी घडलेली नाही. जुलै २०२४ मध्ये परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यात दोन महत्त्वाच्या बैठका झाल्या होत्या. गेल्या चार वर्षांत राजनैतिक बैठकांच्या ३१ फेऱ्या आणि लष्करी चर्चेच्या २१ फेऱ्यांमुळे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरून सैन्य मागे घेण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात करार होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.चीनने अनेक ठिकाणी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) स्वतःचे बदल केले आहेत, ज्याला ते ‘परसेप्शन’ची लढाई म्हणतात. जून २०२०पासून दीर्घ चर्चेत, गलवान व्हॅली, पँगॉन्ग त्सोच्या उत्तरेकडील, कैलाश रेंज, पेट्रोलिंग पॉइंट्स १७–१७ ए आणि १५–१६ या पाच भागांत बफर झोन तयार करण्यात आले. फिंगर–४ आणि फिंगर–८ पँगॉन्ग त्सोच्या उत्तरेस फक्त ८–१० किमी आहेत.ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात पुन्हा बैठक होण्याची शक्यता आहे. यामध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या कराराबाबत अंतिम चर्चा होऊ शकते. तथापि, यापूर्वी गलवान संघर्षापूर्वी दोन्ही नेते १८ वेळा भेटले होते; परंतु २०२० मध्ये भारत–चीन सीमेवर झालेल्या संघर्षानंतर दोन्ही नेते फक्त दोनदा भेटले आहेत, ते २०२२ मध्ये इंडोनेशियामध्ये जी–२० शिखर परिषदेदरम्यान आणि २०२३ मध्ये दक्षिण आफ्रिकेत ब्रिक्स शिखर परिषदेदरम्यान. त्यामुळे २२–२३ ऑक्टोबर दरम्यान, रशियातील कजानमध्ये होत असलेल्या परिषदेत पंतप्रधान मोदी आणि शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय चर्चा होऊ शकते. रशियाच्या पुढाकाराने भारत आणि चीन यांच्यातील ताणलेले संबंध सुधारण्याचा प्रयत्न होत आहे. तसे पाहावयास गेले तर ब्रिक्स देशांमध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांचा समावेश असल्याने आता हे सर्व देश मिळून नव्या चलनाबाबत विचार करत आहेत. जर नवीन चलनावर सहमती झाली, तर त्याचे सदस्य देश अमेरिकन डॉलरच्या बदल्यात या नवीन चलनात परस्पर व्यवहार करू शकतील. हा अमेरिकेसाठी मोठा धक्का ठरू शकतो. त्याचे कारण सध्याच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेवर अमेरिकन डॉलरचे वर्चस्व आहे. व्यापारात चलनाचा वाटा सुमारे ९० टक्के आहे. जवळजवळ १०० टक्के तेलाचा व्यापार अमेरिकन डॉलरमध्ये होतो. अमेरिकेविरुद्धच्या या मोहिमेत चीन–भारत आणि रशियालाही पाठिंबा देऊ शकतो; परंतु ब्रिक्स चलनाची क्षमता आणि गुंतवणूकदारांसाठी त्याचे संभाव्य परिणाम पाहण्याची हीच वेळ आहे, असे मानायला हरकत नाही.

# केज तालुक्यात शिवसेना पुर्णपणे सज्ज

## रणधुमाळी:गद्दारांना जागा दाखवून देणार!



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे व तालुकाप्रमुख अशोक जाधव यांनी गद्दारांना जागा दाखवण्याचे केले आवाहन शिवसेना–उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख मा.उद्धवजी बाळासाहेब ठाकरे युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून, मराठवाडा संपर्कप्रमुख सुनिल प्रभु साहेब,शिवसेना उपनेत्या प्रा.सुषमा ताई आंधारे,शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे ,शिवसेना सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब आंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या उपस्थितीत येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आज बुधवार रोजी केज शिवसेना संपर्क कार्यालय येथे केज तालुका शिवसेना पदाधिकार्यांची व बुथप्रमुखांची महत्वपूर्ण बैठक तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्या आयोजनात संपन्न झाली.यावेळी उपस्थित उपजिल्हाप्रमुख दिपक मोराळे, तालुकाप्रमुख अशोक जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख सोमनाथ गित्ते, जिल्हा समन्वय अनिल देशमुख,जिल्हासचिव रोहित कसबे, जिल्हासहसंघटक दिलीप जाधव,शहरप्रमुख तात्या रोडे, युवासेना तालुकाप्रमुख किशोर घुले, तालुका सचिव सखाराम वायबसे,तालुकासंघटक सुधिर जाधव,लक्ष्मण गलांडे, उपतालुकाप्रमुख सुभाष ठोंबरे,सुरज वाघमारे, शहरसचिव जाहेद शेख, उपशहरप्रमुख पप्पू ढगे,पप्पू कोल्हे, युवासेना शहरप्रमुख अनिकेत गायकवाड, उपतालुकाप्रमुख दिलीप गालफाडे, अश्रफ शेख, दत्ता तांदळे, शहदेव भोसले, ज्ञानेश्वर बोबडे, रामभाऊ पवार, दिलीप खाडे, गणेश निंगुळे, बाळासाहेब कसबे, राजाभाऊ मोटे,विनायक वनवे, आप्पा कांबळे, मधुकर अंधारे,हरिष गिते, अमोल घुले, गोकुळ मोरे, आतम घाडगे, वैजनाथ वाघमारे, शिवाजी इंगळे, बहादुर शेख, राहुल फुके,राम इंगळे,अगंद देशमुख,सह शिवसैनिक उपस्थित होते.

## पान एक वरून

**शक्ती प्रदर्शन न करता**

अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे उपस्थित होते. दरम्यान आपण उमेदवारी अर्ज अतिशय साध्या पद्धतीने भरणार असल्याचे जाहीर केल्यानंतर तहसील परिसर कार्यालयात धनंजय मुंडे यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. यावेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस उपविभागीय अधिकारी अनिल चोरमले ,पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, रघुनाथ नाचन, पोलीस निरीक्षक अनमोल केदार , यांच्यासह पोलीस कर्मचारी पोलीस कर्मचारी तसेच महसूल कर्मचारी उपस्थित होते.

**माजलगावमध्ये होणार**

महाराज मंदिर व महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन, माजलगाव शहरातील जुना मोंढा येथे कै . वसंतराव नाईक साहेब, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन केले,श्रावस्ती बुद्ध विहार वंदन करत हजारो नवयुवकांच्या उपस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय,तहसील माजलगाव येथे माजलगाव मतदार संघाच्या उमेदवारीचा अपक्ष अर्ज दाखल केला. यावेळी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील हजारो नवतरुणांसह विविध जाती धर्मातील कार्यकर्ते बाबरी मुंडे यांच्या समवेत उपस्थित होते.

**युवासेना पदाधिकाऱ्यांची**

जगदीश हरिचंद्र उबाळे जिल्हा उपाध्यक्ष बीड विधानसभा शहर, संतोष नवनाथराव शिंदे शहराध्यक्ष बीड शहर पूर्व (पेठ बीड), उत्कर्ष संजय धपाटे शहराध्यक्ष बीड शहर पश्चिम, रितेश सुनिल अंधारे शहर उपाध्यक्ष बीड शहर पश्चिम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल शिवसेना मा. अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि विपुल पिंगळे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**सरन्यायाधीश म्हणून संजीव**

विविध लवादांमध्ये वकिली केली. घटनात्मक कायदा, कर आकारणी, विविध लवाद, व्यावसायिक कायदे, कंपनी कायदे आणि पर्यावरण कायदे यासारख्या कायद्याच्या अनेक क्षेत्रात त्यांनी यशस्वीरित्या वकिली केली.न्यायमूर्ती खन्ना यांनी प्राप्तिकर विभागासाठी वरिष्ठ वकील म्हणून काम केले आणि २००४ मध्ये दिल्लीच्या एनसीटी (सिव्हिल) विभागासाठीही वकिली केली. दिल्ली उच्च न्यायालयात काही गुन्हेगारी प्रकरणांमध्ये त्यांनी अतिरिक्त सरकारी वकील म्हणूनही भूमिका बजावली.२००५ साली त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून काम करण्यास सुरुवात केल्यानंतर ते २००६ साली न्यायमूर्ती म्हणून कायम झाले. १८ जानेवारी २०१९ रोजी त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून निवड झाली. न्या. संजीव खन्ना हे सध्या राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम करत आहेत. तसेच राष्ट्रीय न्यायिक अकादमी, भोपाळच्या गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य आहेत. जून ते डिसेंबर २०२३ या काळात त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या विधी सेवा समितीचे अध्यक्षपदही भूषविले होते.

**वाळू माफयांनी ग्रामस्थांची**

सर्वसामान्यांना माणसाला आचारसहिता लागू आहे का वाळू माफियांना नाही का असा प्रश्न नागरिकातून उपस्तीत केला जात आहे. मंडळ अधिकारी माने यांना फोन केला असता मंडळ अधिकारी माने सांगतात की आम्हाला काय माहित नाही आता सध्या निवडणूक चालू असल्याने मी काय बघितले नाही असे उडवा उडवी चे उत्तर माने यांनी दिले आहे. तपोनिमगाव गावातून रात्रीचे वेळी ट्रॅक्टरचा धुमाकूळ चालू असल्याने ग्रामस्थांची झोप उडाली आहे. ग्रामस्थांना हा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.व ग्रामस्थांनी उपोषण करण्याचा इशारा सुद्धा दिला आहे. महसूल चे अधिका–यांचे आर्थिक व्यवहारातून मंडळ अधिकारी तलाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. तालुक्यात असणाऱ्या गोदावरी नदीच्या काठावर असलेल्या तपोनिमगाव येथे वाळु उपसा सुरु आहे. या सर्व ठिकाणी वाळूचे प्रमाण मुबलक असल्यामुळे दिवसाढवळ्या वाळू तस्कर वाळूची चोरटी वाहतूक करत आहेत हीच वाळू, माफीया ढिगारे टाकत असून यातून ते अवाच्या सव्वा नफा मिळवत आहेत सर्वसामान्य जनतेची लूट करत आहेत. महसूलच्या अधिकारी हे आर्थिक व्यवहारातून स्वतःच्या फायद्यासाठी वाळू खुला करून दिलं का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या कडे जिल्हा अधिकारी अविनाश पाठक साहेब लक्ष देवून ग्रामस्थांची समस्या सोडावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## पान सहा वरून

**कोटींच्या बजेटमध्ये**

घशात घातले ? किती टक्केवारी देत मलाई मारली असा थेट प्रश्न सध्या नागरिक उपस्थित करत आहेत. केज मतदार संघात एखादा बगीचा, गार्डन सुध्दा आ. नमिता मुंदडांना उभारता आले नाही, आणी जे काही बोटावर मोजण्या इतपत कामे झाली आहेत त्यात सगळा टक्केवारीचा खेळ खेळत आपल्याच पक्षाच्या बडया नेत्याला टक्केवारी देऊन खेळला गेला असा आरोप जनता आता करत आहे. केज मतदार संघावर मुंदडा कुटुंबाची मक्तेदारी असतांना विकास नावाचे भकास राजकारण खेळत फक्त आपला आणी आपल्या पक्षाच्या एका बड्या नेत्याचा टक्केवारी देऊन आ. नमिता मुंदडांनी विकास केला असुन केज मतदार संघातील नागरिकांना वार्यावर सोडले आहे. आणी पुन्हा जर आ.नमिता मुंदडानाच आमदारकीचे उमेदवार म्हणून महायुती उभा करत असेल तर येणाऱ्या विधानसभेत केज मतदार संघाच्या विकासात सपशेल फोल आणी स्वताच्या नावाचा फक्त ढोल वाजवणाऱ्या भाजपाच्या आ. नमिता मुंदडांचा सुपडासाफ जनता केल्याशिवाय राहणार नाही अशी केज मतदार संघात जोरदार चर्चा सुरू आहे.

**टपरीवर खुलेआम गुटखा**

त्यामुळेच सर्व चौकातील टपरी चालक खुलेआम गुटखा विक्री करताना दिसत आहेत केज तालुक्यात विविध भागांत वितरण कसा गुटखा केला जातो? कोणत्या व्यवसायाच्या माध्यमातून हा गुटखा विक्रेत्यांकडे पोहोचवला जातो ? गुटख्यामुळे देशाचे भावी आधारस्तंभ असलेल्या तरुण पिढीचे आरोग्य धोक्यात आले आहे. यामुळे व्यसनाधीनता मोठ्या प्रमाणात वाढत असून, युवा पिढी गारद होत आहे. ही मोठी सामाजिक हानी आहे. याकडे अन्नऔषधे प्रशासन विभागाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे म्हणूनच केज तालुक्यात प्रत्येक चौकातील टपरीवर सर्व प्रकारचा गुटखा विक्री सुरू आहे. अन्न औषध प्रशासन विभाग केज शहरातील गुटखा विक्रीला बंद का ? करत नसेल असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

**गेवराईत निवडणूक वातावरण**

पिसाळ, तनुजाताई पठाण आणि सौ. विजयमाला राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवछत्र निवास्थानी माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांचे आशिर्वाद घेऊन विजयसिंह पंडित यांनी सकाळी नामलगाव येथील आशापुरक गणपती, पेंडगाव येथील जागृत देवस्थान मारोतीराया, शिवाजीनगर गढी येथील जय भवानी देवी आणि तलवाडा येथील त्वरिता देवीचे दर्शन घेतले, गेवराई शहरातील हजरत गैबी साहेब दर्ग्यावर चादर चढवून आशिर्वाद घेतले. बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी अतिशय सध्या पद्धतीने लाडक्या बहिणींना सोबत घेऊन उमेदवारी अर्ज दाखल केला. गेवराई विधानसभा मतदार संघातील मतदारांनी या साधेपणाचे स्वागत केले. महिलांना सन्मानाची वागणूक देत प्रातिनिधिक स्वरूपात लाडक्या बहिणीचा सन्मान केला असल्याची चर्चा गेवराई शहरात आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना मतदार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नागरिकांनी आक्षेपार्ह पोस्ट करु**

करू नका. फोटो, व्हिडिओ (मॉर्फिंग) बनवून प्रसारित करू नका. अशा पोस्टवर सोशल मीडियावर आपले मत व्यक्त करु नका. ते कायद्याने गुन्हा आहे. मतदारांचे मन वळविण्यासाठी कोणत्याही धर्म, जातींबाबत द्वेष पसरविणाऱ्या पोस्ट करू नका.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण होईल, अशा प्रकारच्या पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित करु नका. दोन गटांत तणाव निर्माण होईल, अशा पोस्ट सोशल मीडियावर करु नका असे आवाहन सपोनि सोमनाथ नरके यांनी सर्व जनतेला आवाहन केले आहे जर कोणी याचे पालन केले नाही तर त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल तसेच सदर पोस्ट व्हायरल करणाऱ्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले जातील यामुळे सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोष्ट करने टाळावे असे आवाहन सपोनि सोमनाथ नरके यांनी केले आहे.

**...तोपर्यंत मैदान सोडणार**

पवार यांनी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात भूमिका जाहीर करून, अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले. गेवराई मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी आपली भावना व्यक्त करून, आमदार पवार यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उभे राहावे. आम्ही जीवाचे रान करून तुम्हाला निवडून आणू ,असा शब्द दिला. दहा वर्षापासून आमदार पवार यांनी केलेली विकास कामे. जनतेसमोर ठेवून मते मागू आणि आमदार पवारांना निवडून आणू , असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. आ. लक्ष्मण पवार यांच्या मळ्यात गेवराई मतदारसंघातील कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यावेळी, कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आमदार पवार यांनी माघार घेऊ नये, असे आवाहन केले. आमदार पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, पंधरा महिन्यात माझी तब्येत चांगली नाही. म्हणून, सार्वजनिक कार्यक्रमात आलो नाही. पण, विकासाच्या कामासाठी एक ही बैठक सोडली नाही. तब्येतीकडे दूर्लक्ष करून शासकीय बैठकीला गेलो. म्हणून, विकास कामे झाली आहेत. एका दिवसात विकास निधी येत नाही. हे सर्व सामान्य माणसाला सुद्धा कळते.दहा वर्षात राजकारण बदलले आहे. असे वाटत असतानाच, पंडितांची दादागिरी संपलेली नाही. त्यामुळे, काही गोष्टी सोडता येत नाहीत. जनतेला, कार्यकर्त्यांना उघड्यावर सोडले तर देव सुद्धा मला माफ करणार नाही. अशी भावनिक साद ही आमदार पवार यांनी यावेळी बोलताना घातली. कार्यकर्त्यांची मान आमच्या खांद्यावर आहे. त्या गोष्टीचा आम्हाला कधीच विसर पडणार नाही. मात्र, माझी तब्येत ठीक नाही.दोन महिन्यांपासून पायाला जखम झाली आहे. ती अजून ही बरी झाली नाही. एक दोन दिवसात डॉक्टरांनी बोलावले आहे. फार दगदग होणार नाही. तरीही, राहीलेल्या दिवसात, मी स्वतः दिडशे गावात जाईल. पण, तुम्ही सर्वजण उमेदवार आहात ,असे समजून प्रचार करा. विरोधक भांडवल करतील, कुठेत उमेदवार ? खर सांगतो, मी अनेक गावात गेलो ही नसेल. शिवराज बाळराजे पवार, गिताभाभी यांनी जनतेला वेळ दिला. पण, मी विकास कामात कुठेही कमी पडलो नाही. मते पडली नाहीत म्हणून, त्या गावात विकास केला नाही. असा विचार मी केला नाही. उलट त्या गावांना ही निधी दिला आहे. आजारी असून ही, कर्तव्य म्हणुन रकार दरबारी बैठकांना गैरहजर राहीलो नाही. त्या बैठकीत गेलो. मतदारसंघातील कामांचा पाठपुरावा केला. म्हणून, मतदारसंघात विकास कामे झाल्याचे आमदार लक्ष्मण पवार यांनी यावेळे सांगितले. सोबत असलेल्या कार्यकर्त्यांच्या जीवावर अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार आणि जिंकणार, असा विश्वास ही आमदार पवार यांनी शेवटी बोलताना व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

**तिरुपती हॉस्पिटलमध्ये जन आरोग्य**

ग्रामीण भागातील गरीब परिस्थितीत असलेल्या रुग्णांना याचा मोठा दिलासा मिळत आहे. आज मोठे मोठे आजारावर व छोटे आजारावर शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्णांना पसी आर्थिक बाजू कमी असते परंतु आता रूग्णांनाना लागणारा खर्च महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान कार्डाच्या माध्यमातून मदत होत आहे. अत्यावश्यक रुग्णांना लागणारे ब्लड सुद्धा तिरुपती हॉस्पिटल मध्ये ब्लड बँक सुरू झालेली आहे. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत पिवळे, केसरी, पांढरे,रेशन कार्ड, आयुष्यमान कार्ड धारकांना या योजनेचा योजनेअंतर्गत ऑपरेशन व वैद्यकीय उपचार मोफत केले जातील. योजनेचा तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन तिरुपती हॉस्पिटल व ब्लड बँकेचे संचालक डॉ गोविंद पंडितराव लेंडगुळे, डॉ गायत्री गोविंद लेंडगुळे यांनी आवाहन केले आहे.

**केजला पुन्हा अतिक्रमणाचा**

रस्त्यावर उभे असल्याने चालने मुश्किल झाले आहे तसेच प्रवासी वाहने, मालवाहतूक वाहन चालवने मुश्किल झाले आहे तर रस्त्याच्या कडेने तयार झालेल्या टपऱ्या वर उभे राहून टवाळखोर मुले मुलीना छेडणे अश्लील टिप्पणी करणे असे प्रकार चालू आहेत. त्यातच रस्त्यावर वाहतूकीचे नियोजन करण्या साठी ट्राफिक पोलीसांची गरज असताना एक पोलीस कर्मचारी रस्त्यावर दिसत नाहीत. पोलीस स्टेशन च्या समोर ट्राफिक पोलीस बॅरेकेटस लावून तिथेच चलन फाडणे. गाड्या आडवण्याचे कामे करतात पण जिथे गर्दी आहे जास्त प्रमाणात रहदारी आहे तिथे पोलीस कधीच दिसत नाही. पोलीस ठाणे ते पोलीस ठाण्याच्या बाहेर रस्त्यावर येवढ्याच जागेत ट्राफिक पोलीस दिसताता. तरी आता केज मधील अतिक्रमण पुन्हा एकदा खंबीर होऊन प्रशासनाने काढावे. निवडणूकीच्या अनुशंगाने तहसील समोरील अतिक्रमण निघत असेल तर मग संपुर्ण केज शहरातील व मुख्य महामार्गावरील अतिक्रमण का निघत नाही? आता या काळात प्रशासनाला पोलीस फोर्स मागवायची गरज नाही कारण निवडणुकी साठी बीएसएफ चे जवान केज मध्ये बंदोबस्ता साठी आले आहेत. फक्त प्रशासनाने मनावर घेणे गरजेच आहे.असे आता नागरिक चर्चा करत आहेत. पुन्हा एकदा केज शहरातील अतिक्रमण काढून मोकळा श्वास घेण्या साठी प्रशासनाकडून कडक कारवाई करावी अशी मागनी तालुक्यातील जनता करत आहे.

**वारसांना चार लाखांचा**

करून अखेर गुरुवारी या दोन्ही मयतांच्या वारसदार नाथा झिपा राठोड(बोरमाळ तांडा) व मच्छिंद्र राठोड(हनुमंत खेडा) यांना तहसीलदार मनीषा मेने–जोगदंड यांच्या हस्ते प्रत्येकी चार लक्ष रु मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला यावेळी सरपंच जीवन राठोड, विकास चव्हाण, सुनील राठोड, सदाशिव राठोड,,नाना साबळे,धारा चव्हाण रमेश चव्हाण आदींची उपस्थिती होती.

**सुख,शांतीचा मार्ग**

अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी शक्ती ग्रुप ऑफ कंपनीजचे वरिष्ठ उपाध्यक्ष पेरूमल, राष्ट्रसंचार व पंढरी संचार वृत्तपत्राचे संचालक संपादक बाळासाहेब बडवे, डॉ. संजय उपाध्ये, गिरीश दाते व राजेंद्र रणभोर उपस्थित होते.तामिळनाडूच्या कोयंबटूर मधील कुमारागुरू संस्थेच्या वतिने कुमारागुरू फाउंडेशन डे आणि अरूचेलवर यांच्या जन्म शताब्दी निमित्त डॉ. विश्वनाथ दा कराड व सौ.उषा विश्वनाथ कराड यांचा ‘अरूचेलवर डॉ. एन. महालिंगम पुरस्कार’ देऊन नुकताच विशेष सत्कार करण्यात आला होता. या संपूर्ण कार्यक्रमाची आणि एमआयटी डब्ल्यूपीयू संदर्भातील सर्व कार्याचा आढावा या ग्रंथात नमुद करण्यात आला आहे.प्रा.डॉ. विश्वनाथ दा.कराड म्हणाले, संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम यांच्या तत्वज्ञानाचे पालन एमआयटी शिक्षण संस्था विद्यार्थ्यांचे जीवन घडवित आहे. तसेच जगातील सर्वात मोठ्या डोमची निर्मिती करून संपूर्ण मानव जातीला शांतीचा संदेश देण्याचे कार्य सुरू आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# राष्ट्रवादी उमेदवारांची यादी

- बारामती- अजित पवार
- येवला- छगन भुजबळ
- आंबेगाव- दिलीप वळसे-पाटील
- कागल- हसन मुश्रीफ
- परळी- धनंजय मुंडे
- दिंडोरी-नरहरी झिरवाळ
- अहेरी- धर्मराव बाबा आत्राम
- श्रीवर्धन- आदिती तटकरे
- अंमळनेर- अनिल भाईदास पाटील
- उदगीर- संजय बनसोडे
- अर्जुनी मोरगाव- राजकुमार बडोले
- माजलगाव- प्रकाश दादा सोळंके
- वाई- मकरंद पाटील
- सिन्नर- माणिकराव कोकाटे
- खेड आळंदी- दिलीप मोहिते
- अहमदनगर शहर- संग्राम जगताप
- इंदापूर- दत्तात्रय भरणे
- अहमदपूर- बाबासाहेब पाटील
- शहापूर- दौलत दरोडा
- पिंपरी- अण्णा बनसोडे
- कळवण- नितीन पवार
- कोपरगाव- आशुतोष काळे
- अकोले- किरण लहामटे
- बसमत- चंद्रकांत उर्फ राजू नवघरे
- चिपळूण- शेखर निकम
- मावळ- सुनील शेळके
- जुन्नर- अतुल बेनके
- मोहोळ -यशवंत विठ्ठल माने
- हडपसर- चेतन तुपे
- देवळाली- सरोज आहिरे
- चंदगड- राजेश पाटील
- इगतपुरी- हिरामण खोसकर
- तुमसर- राजू कारेमोरे
- पुसद- इंद्रनील नाईक
- अमरावती शहर- सुलभा खोडके
- नवापूर - भरत गावित
- पाथरी - निर्मला विटेकर
- मुंब्रा-कळवा - नजीब मुल्ला


# शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार

- कोपरी पाचपाखाडी - एकनाथ शिंदे
- साक्री (अज) - मंजूळाताई गावित
- चोपडा (अज) - चंद्रकांत सोनावणे
- जळगाव ग्रामिण - गुलाबराव पाटील
- एरंडोल - अमोल चिमणराव पाटील
- पाचोरा - किशोर पाटील
- मुक्ताईनगर - चंद्रकांत पाटील
- बुलढाणा - संजय गायकवाड
- मेहकर (अजा) - डॉ. संजय रायमुलकर
- दर्यापूर (अजा) - अभिजित अडसूळ
- रामटेक - आशिष जैस्वाल
- भंडारा (अजा) - नरेंद्र भोंडेकर
- दिग्रस - संजय राठोड
- नांदेड उत्तर - बालाजी कल्याणकर
- कळमनुरी - संतोष बांगर
- जालना - अर्जून खोतकर
- सिल्लोड - अब्दुल सत्तार
- छत्रपती संभाजीनगर मध्य - प्रदीप जैस्वाल
- छत्रपती संभाजीनगर पश्चिम (अजा) - संजय शिरसाट
- पैठण - विलास भूमरे
- वैजापूर - रमेश बोरनारे
- नांदगाव - सुहास कांदे
- मालेगाव बाह्य - दादाजी भुसे
- ओवळा माजीवडा - प्रताप सरनाईक
- मागाठाणे - प्रकाश सुर्वे
- जोगेश्वरी (पूर्व) - मनिषा वायकर
- चांदिवली - दिलीप लांडे
- कुर्ला (अजा) - मंगेश कुडाळकर
- माहिम - सदा सरवणकर
- भायखळा - यामिनी जाधव
- कर्जत - महेंद्र थोरवे
- अलिबाग- महेंद्र हरी दळवी
- महाड- भरतशेठ मारुती गोगावले
- उमरगा- ज्ञानराज धोंडीराम चौगुले
- परांडा- डॉ.तानाजी जयवंत सावंत
- सांगोला- शहाजी बापू पाटील
- कोरेगाव- महेश शिंदे
- पाटण- शंभूराज देसाई
- दापोली- योगेश कदम
- रत्नागिरी- उदय सामंत
- राजापुर- किरण सामंत
- सावंतवाडी- दीपक केसरकर
- राधानगरी- प्रकाश आबिटकर
- करवीर- चंद्रदिप नरके
- खानापुर- सुहास बाबर

# मनसेचे उमेदवार

- कल्याण ग्रामीण - प्रमोद (राजू) पाटील
- माहिम - अमित राज ठाकरे
- भांडुप पश्चिम - शिरीष सावंत
- वरळी - संदीप देशपांडे
- ठाणे शहर - अविनाश जाधव
- मुरबाड - संगिता चेंजवणकर
- कोथरुड - किशोर शिंदे
- हडपसर - साईनाथ बाबर
- खडकवासला - मयुरेश वांजळे
- मागाठाणे - नयन कदम
- बोरीवली - कुणाल माईणकर
- दहिसर - राजेश येरुणकर
- दिंडोशी - भास्कर परब
- वर्सोवा - संदेश देसाई
- कांदिवली पूर्व - महेश फरकासे
- गोरेगाव - विरेंद्र जाधव
- चारकोप - दिनेश साळवी
- जोगेश्वरी पूर्व - भालचंद्र अंबुरे
- विक्रोळी - विश्वजित ढोलम
- घाटकोपर पश्चिम - गणेश चुक्कल
- घाटकोपर पूर्ण - संदीप कुलथे
- चेंबूर - माऊली थोरवे
- चांदिवली - महेंद्र भानुशाली
- मानखुर्द-शिवाजीनगर - जगदीश खांडेकर
- ऐरोली - निलेश बाणखेले
- बेलापूर - गजानन काळे
- मुंब्रा - कळवा - सुशांत सूर्यराव
- नालासोपारा - विनोद मोरे
- भिवंडी पश्चिम - मनोज गुळवी
- मिरा-भाईंदर - संदीप राणे
- शहापूर - हरिश्चंद्र खांडवी
- गुहागर - प्रमोद गांधी
- कर्जत-जामखेड - रवींद्र कोठारी
- आष्टी - कैलास दरेकर
- गेवराई - मयुरी म्हस्के
- औसा - शिवकुमार नागराळे
- जळगांव शहर - अनुज पाटील
- वरोरा - प्रवीण सूर
- सोलापूर दक्षिण - महादेव कोगनुरे
- कागल - रोहन निर्मळ
- तासगांव-कवठे महाकाळ - वैभव कुलकर्णी
- श्रीगोंदा - संजय शेळके
- हिंगणा - विजयराम किनकर
- नागपूर दक्षिण - आदित्य दुरूगकर
- सोलापूर शहर- उत्तर - परशुराम इंगळे

# निवडणुकीच्या काळात येणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या नियमित विषम सत्राच्या हिवाळी २०२४-परीक्षा ह्या येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान म्हणजेच ११ नोव्हेंबर २०२४ ते २१ नोव्हेंबर २०२४ होत होत्या आणि त्याच दरम्यान महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार परीक्षा समोर ढकलण्याचे निवेदन विद्यापीठाने मान्य केले. परिक्षेच्या काळात प्रचार रॅली, प्रचार सभा, भोंग्याच्या आवाज या सर्व गोष्टींचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर झाला असता, या सर्व गोंधळात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता होती. त्याचप्रमाणे एल एल बी दुसऱ्या सत्राचा निकाल उशिरा लागल्याने नियमित विद्यार्थ्यांचे व कॅरीऑन विद्यार्थ्यांचे प्रवेश उशिरा झाले आणि त्यात अभ्यासक्रमात बदल झाल्याचे परिपत्रक जाहीर केले. तोपर्यंत विद्यार्थ्यांनी कोणता अभ्यास करायचा हे विद्यापीठाने अधिकृतरीत्या जाहीर केले नव्हते. त्यामुळे त्या परिपत्रकापासून शासकीय सुट्या वगळता फक्त ३३ दिवसाचा कालावधी विद्यार्थ्यांना मिळत आहे, जो की खूप कमी प्रमाणात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हीत लक्षात घेऊन विद्यापीठाचे कुलगुरू तसेच डॉ. नितीन कोळी, संचालक परिक्षा विभाग यांनी विद्यार्थ्यांच्या निवेदनाची दखल घेत डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात म्हणजेच २७ डिसेंबर २०२४ ते ६ जानेवारी २०२५ दरम्यान परीक्षा घेण्याची मागणी मान्य केली व तसा सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना पाठवण्यात आला.

# पावसामुळे भात कापणी लांबणीवर

## भात पिके आणि नाचणी-वरई शेतातच आडवी शेतकरी चिंतेत



वृत्तसंस्था

**पुणे :** मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणची भातशेती पाण्यात सापडली आहे. राज्यातील अनेक भागात भात कापणीला आले असताना पावसामुळे भात शेती पूर्णतः झोपवून दिली आहे.

कापणीला आलेल्या भात पिकाला पाण्याची फारशी गरज नसते. मात्र, अशा परिस्थितीत शेतात पाणी भरल्याने भात पिकावर कीड रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असून भात कापणी लांबणीवर पडली आहे. मागील आठवड्यात झालेल्या पावसामुळे नाशिकसह कोकणातील भात शेतीवर चांगलाच परिणाम झाला आहे. कापणीसाठी परिपक्व झालेली भातपिके आणि नाचणी-वरई शेतातच आडवी झाल्याने बळीराजा चिंतातुर झाला आहे. भातशेतीत पाणी साचल्याने हाता तोंडाशी आलेले भात पीक वाया जाण्याची भीती आहे. दिवाळीपर्यंत भात कापणीची तयारी सुरू असते. यासाठी कापणीच्या साहित्याची जुळवा जुळव करणे. मजुरांची जुळवाजुळव करणे आदी कामे होत असतात. अशातच पाऊस झाल्याने भात कापणीचे नियोजनच कोलमडले आहे. कापणीच्या वेळी शेतात पाणी राहिल्यास कापलेला कडपा व्यवस्थित ठेवता येत नाही. कापलेल्या भाताच्या लोंबे पाण्यात भिजल्याने दाणा खराब होतो. त्याचबरोबर चिखलातून भात कापणी करण्यासाठी ज्यादा मनुष्यबळाची गरज भासते. अशा अनेक समस्यांमुळे भात कापणी लांबणीवर पडलेली आहे;

### भात पिकाचे नुकसान

यावर्षी पाऊस चांगला झाल्याने भात उत्पादक शेतकरी सुखावले होते. भात पिके ही जोमात होती. मात्र, यावर्षी ऑक्टोबर शेवटी परतीच्या पावसाने ऐन भात कापणीच्या वेळेस थैमान घातल्याने भातपिके शेतातच आडवी झाली आहेत. यात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या परतीच्या पावसामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी कापलेले भातपीक शेतात आहे तर काही पीक कापणीच्या लायक शिल्लक राहिलेले नाही. सतत पडणाऱ्या परतीच्या पावसाने परिपक्व झालेली भात पिके निकृष्ट दर्जाची झाली असून भात पिकापासून मिळणारी, गुरांच्या वैरणीचाही प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे.

# जनतेच्या मनातला सामान्य आमदार मिळेल

### उमेदवारी घोषित होताच महेश सावंत यांचा टोला



देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीत माहिम मतदारसंघाची लढत चुरसीची होणार आहे. कारण याठिकाणी मनसे अध्यक्ष राज ठाकरेंचे पुत्र अमित ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर महायुतीकडून सदा सरवणकर यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. उद्धव ठाकरेंनीही या मतदारसंघात महेश सावंत यांना उमेदवारी घोषित केली आहे. त्यामुळे माहिम मतदारसंघात तिरंगी लढत होईल. एका सर्वसामान्य व्यक्तीला उद्धव ठाकरेंनी न्याय दिला आहे. या मतदारसंघात जनतेच्या मनातला सामान्य आमदार भेटेल अशी पहिली प्रतिक्रिया ठाकरे गटाचे उमेदवार महेश सावंत यांनी दिली आहे. माध्यमांशी महेश सावंत यांनी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, आजपर्यंत आम्ही जनतेची सेवा केली आहे. कुठल्याही कामासाठी रात्री अपरात्री धावून गेलो आहे. जनतेच्या मनातला सामान्य आमदार त्यांना भेटेल. माझ्यासमोर कोण उभे आहे हे मी बघत नाही. आम्ही काम करत असतो, जनतेची सेवा करतो. मी कुणावरही वैयक्तिक टीका करणार नाही. कोण काम करणार आणि कोण घरी बसणार हे जनतेला माहिती आहे. जनता २० तारखेला मतदान करतील त्यानंतर २३ तारखेला आमचा जल्लोष बघा असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच ठाकरे घराण्यातील उमेदवार असल्याने काही टेन्शन नाही, उद्धव ठाकरे निवांत आहेत. लोकसभा निवडणुकीतील मतदानाचा काही फरक पडणार नाही. माहिम मतदारसंघात शिवसेनेचा भगवा फडकवणार आहे. कितीही आव्हान असेल तर जनतेला रात्री मदतीला धावून येणारा उमेदवार त्यांना भेटला आहे. बाळासाहेबांची शिवसेना जशी काम करत होती तसेच काम होणार आहे. या मतदारसंघात १०० टक्के विजय उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाचा होणार आहे अशी खात्री असल्याचे महेश सावंत यांनी म्हटले.

# तुळजाभवानी मंदिर संस्थानचा लोगो मतदानातून निवडणार

### मतप्रक्रिया सर्व भक्तांसाठी खुली



देशोन्नती वृत्तसंकलन

**धाराशिव :** श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे बोधचिन्ह (लोगो) निश्चित करण्यासाठी तज्ज्ञांच्या परीक्षणानंतर पाच लोगोंची निवड करून ते संस्थानच्या संकेतस्थळावर टाकण्यात आले आहेत. आता नागरिकांमधून मतदान घेऊन नंतर लोगोची निश्चिती होणार असून, यासाठी ३ नोव्हेंबरपर्यंत आपले मत नोंदवावे, असे आवाहन मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

१८ जून २०२४ रोजी पार पडलेल्या श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान विश्वस्त सभेतील १२ क्रमांकाच्या ठरावानुसार श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचा नवीन लोगो बनविण्याबाबतचा ठराव घेण्यात आला होता. सध्या असणारा बोधचिन्ह (लोगो) हा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचा लोगो असल्याबाबत लवकर लक्षात येत नसल्याने किंवा तो तितका आकर्षक नसल्याने नव्याने लोगो तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी स्पर्धा घेऊन, त्यासाठी बक्षीस ठेवून, ईओआय प्रसिद्ध करून त्याद्वारे प्राप्त होणाऱ्या डिझाइनमधून आकर्षक डिझाइन निश्चित करून त्याप्रमाणे लोगो तयार करण्याच्या ठरावास यावेळी सर्वानुमते मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार लोगोसंबंधीचे ईओआय श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या संकेतस्थळावर ६ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर २०२४ पर्यंत प्रसिद्ध करण्यात आले होते. तसेच या विषयाच्या अनुषंगाने मंदिराचे १३ सप्टेंबर २०२४ रोजीचे पत्रही मंदिराच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले होते. दरम्यान, या क्षेत्रातील स्वारस्य असणाऱ्यांना सादरीकरणासाठी १९ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आमंत्रित करण्यात आले होते.

# पुणे महापालिकेच्या शिरपेचात राष्ट्रीय जल पुरस्कार



देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे :** केंद्रीय जलशक्ती मंत्रालयातर्फे देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जल पुरस्कारामध्ये शहरी विभागात पुणे महापालिकेला तृतीय क्रमांक मिळाला. दिल्ली येथील विशेष कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत तो प्रदान करण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. राजेद्र भोसले, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी हा पुरस्कार स्वीकारला. शहराच्या सर्व भागांत समान दाबाने आणि कायम पाणीपुरवठा व्हावा, यासाठी महापालिकेच्या वतीने समान पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. २०४७ पर्यंतचा विचार करून शहराची लोकसंख्या ५० लाख गृहीत धरत या योजनेची आखणी करण्यात आली आहे. या योजनेनुसार शहरातील पाणी वितरणामधील ४० टक्के गळती कमी करण्याचेही उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

शहरातील ७६ टक्के घरांमध्ये नळाद्वारे पाणी पुरवले जाते. शहरात दररोज चार तास पाणीपुरवठा होतो. दरडोई १५७ लिटर पाणीपुरवठा होतो. शहरातील ४३ टक्के नळजोडांवर मीटर बसविण्यात आले आहेत. पुणेकरांना १०० टक्के दर्जेदार पाणी पुरवले जाते. तसेच पाणीपुरवठ्याबाबतच्या ८५ टक्के तक्रारींचे निवारण केले जाते. पाणीपट्टीच्या वसुलीचे प्रमाण ६० टक्के असून, महसूल न मिळणाऱ्या पाण्याचे (एनआरडब्ल्यू) प्रमाण ३० टक्के आहे.

# ट्रक-दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

### ट्रक जळून खाक; वाहतूक विस्कळीत

**चिपळूण/रत्नागिरी :** गुहागर विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील घोणसरे-चिवेली फाटा येथे काल, मंगळवारी रात्री ट्रक व दुचाकी यांच्यामध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर आणखी एक तरुण गंभीर जखमी झाला. अपघातादरम्यान आयशर ट्रकला अचानक आग लागून ट्रक जळून खाक झाल्याने मोठे नुकसान झाले. सौरभ अनिल घोरपडे (२६) रा. मार्कंडी असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. तसेच प्रफुल कदम (चिवेली) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर डेरवण रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याप्रकरणी आयशर ट्रक चालक रमाकांत जाधव (५९) रा. शृंगारतळी, गुहागर याला ताब्यात घेतले आहे. मृत सौरभ घोरपडे हा तरुण चिपळुणातील एका फायनान्स कंपनी वसुलीचे काम करत होता. गुहागरकडून-चिपळूणकडे येणाऱ्या भंगार वाहतूक करणाऱ्या आयशर ट्रकची दुचाकीस्वाराला डाव्या बाजूस जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला.

# देवरुखनजीक वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार

**देवरुख/रत्नागिरी :** वाहनाच्या धडकेमुळे बिबट्या ठार झाल्याची घटना संगमेश्वर तालुक्यातील देवरुखनजीकच्या कांजिवरा येथे आज, बुधवारी सकाळी उघडकीस आली. जोरदार धडकेमुळे बिबट्या जागीच ठार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. देवरुख ते मार्लेश्वर या मार्गावरील कांजिवरा गावानजीक बुधवारी सकाळी रस्त्यावर बिबट्या मृतावस्थेत आढळला. त्याच्या आसपास रक्त पडलेले असल्याने वाहनाच्या धडकेने त्याचा मृत्यू झाला असल्याचा अंदाज आहे. हा बिबट्या नर जातीचा असून, अंदाजे अडीच वर्षांचा आहे.



**कामशेत /पिंपरी चिंचवड:** मावळच्या डोंगरमाथा आणि रानमाळावर रानभाज्यांची उगवण यंदा जोमात झाली आहे. वनवासी कातकरी आणि आदिवासी ठाकर मंडळींनी विक्रीसाठी कामशेत, पवनानगर, लोणावळा आणि वडगाव मावळ बाजारात त्या आणण्यास सुरुवात केली आहे.

# के. पी. पाटील यांच्या हाती अखेर शिवबंधन

**कोल्हापूर :** जिल्ह्यातील राधानगरी-भुदरगड विधानसभेचे माजी आमदार के. पी. पाटील यांनी आज बुधवारी (दि. २३) मातोश्री येथे त्यांच्या सहकाऱ्यांसह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश केला. त्यांच्या मनगटावर शिवबंधन बांधून उद्धव ठाकरे यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत, शिवसेना नेते विनायक राऊत, आमदार मिलिंद नार्वेकर आणि इतर पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.

# ठाणे हिट अँन्ड रन प्रकरणात कारचालकाला अटक

### मनसेने केली होती कारवाईची मागणी

**ठाणे :** आलिशान मोटारकारने सोमवारी पहाटे दुचाकीचालकाला उडविणाऱ्या अभिजित नायर (२६) रा. ठाणे याची अपघातग्रस्त कार जप्त केल्याची माहिती सहायक पोलीस आयुक्त प्रिया डमाळे यांनी मंगळवारी दिली. नौपाडा पोलिसांनी मंगळवारी सायंकाळी अभिजितला ताब्यात घेतले आहे.

या घटनेत दुचाकीचालक दर्शन हेगडे (२१) रा. ठाणे यांचा मृत्यू झाला. संत ज्ञानेश्वर नगरातील साईकृपा चाळीत राहणाऱ्या दर्शनच्या कुटुंबियांची मनसेचे ठाणे-पालघर जिल्हाप्रमुख अविनाश जाधव यांनी भेट घेतली. त्यानंतर त्यांनी फरार आरोपीवर कडक कारवाईची मागणी केली.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार; एकाला जन्मठेप

### बारामती येथील विशेष न्यायाधीशांचा निर्णय



**पुणे :** अल्पवयीन मुलीशी बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या संतोष कांबळे याला विशेष न्यायाधीश ए. ए. शहापुरे यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी ही घटना घडली होती.

संतोष कांबळे हा त्याच्या नातेवाइकांच्या सावटण्याच्या विधीसाठी कटफळ (ता. बारामती) येथे आला होता. त्याच दिवशी संध्याकाळी सहाच्या सुमारास त्याने एका नऊवर्षीय मुलीस, 'यात्रेत बाहुल्यावर बसवतो, तुझ्या मामाने पाण्याची बाटली आणायला सांगितली आहे,' असे सांगून तिला १०० रुपयांची नोट देत दुचाकीवर जबरदस्तीने बसविले. तिला कटफळ-गाडीखेल रस्त्याने पुढे नेत बारामती एमआयडीसीतील एका कंपनीलगत वन विभागाच्या पडीक जागेत नेत तिला जिवे मारण्याची धमकी देऊन तिच्यावर तीनदा लैंगिक अत्याचार केला. तिला पुन्हा दुचाकीवर बसवून कटफळ गावात आणून सोडले. इकडे तिची आजी गावात शोध घेत होती. मुलगी गावात सापडल्यानंतर आजीने चौकशी केली असता तिने घडलेला प्रकार सांगत आरोपी दाखविला.

# नदीच्या प्रवाहात वाहून 8 वर्षीय मुलाचा मृत्यू

**पुणे :** जुन्नर तालुक्यात ओतूर येथे ८ वर्षीय मुलगा सार्थक शिंदे मांडवी नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये पडून वाहून गेल्याची घटना घडली आहे. ओतूर ता. जुन्नर येथील मांडवी नदी केटी बंधारा येथे मंगळवार २२ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० च्या सुमारास सानिका अमोल कोकाटे ही कपडे धुण्यासाठी गेली होती. यावेळी सार्थक गोरख शिंदे (८) रा. ओतूर ता. जुन्नर जि. पुणे हा देखील मावशी बरोबर आला होता.

# पावसामुळे कांद्याचे रोप पाण्यात

देशोन्नती वृत्तसंकलन

**नाशिक:** राज्यभरामध्ये सध्या पावसाने धुमाकूळ घातला असून यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नाशिक, नगर जिल्ह्यामध्ये कांदा, सोयाबीन पिकांचे नुकसान झाले असून रब्बी कांदा लागवडीसाठी तयार करण्यात आलेले रोप पावसाच्या पाण्याखाली गेले आहेत.

यामुळे शेतकऱ्यांना कांद्याच्या रोपांची दुबार पेरणी करण्याची वेळ आलेली आहे. मागील दोन आठवड्यापासून सोलापूर, पुणे, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर जोरदार पाऊस पडत आहे. वादळी वाऱ्यांसह आणि विजेच्या गडगडाटासह पडत असलेल्या पावसामुळे फळबागा, भाजीपाला पिके, फुल पिके, कापूस, सोयाबीन, मका, कांदा या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

> आमच्या पारनेर तालुक्यातील कांद्याचे जवळपास ९० टक्के शेतकऱ्यांचे रोप पावसामुळे वाया गेले आहेत. त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांना कांद्याचे बियाणे परत खरेदी करावे लागले आहेत. यामुळे खात्रीचे बियाणे मिळण्याची शक्यता कमीच आहे.
>
> गणेश लंके (कांदा उत्पादक **शेतकरी, पारनेर)**

### पुन्हा रोपे तयार करण्याची वेळ

या पावसामुळे नाशिक जिल्ह्यातील जवळपास ३० ते ७० टक्क्यापर्यंत कांद्याचे रोपे वाया गेली आहेत. रब्बी हंगामातील कांदा नाशिक, नगर जिल्ह्यातील पारनेर, संगमनेर तालुक्यात, त्याचबरोबर पुणे, सातारा, सोलापूर, बीड आणि धाराशिवमध्येही कांद्याची लागवड केली जाते. यासाठी शेतकऱ्यांनी कांदा रोपांची नर्सऱ्या केल्या आहेत. नुकसानीमुळे शेतकऱ्यांवर आता बियाणे पुन्हा खरेदी करण्याची वेळ आली आहे.

### बियाण्याची कमतरता



फळबाग व्यवस्थापन

# शेतीसाठी लागणारी सुधारित कृषी अवजारे आणि यंत्रे

**शेतीमध्ये विविध शेती कामाचे यांत्रिकीकरण करणे गरजेचे आहे. अशा यांत्रिकीकरणाने शेतीची कामे वेळचीवेळी होऊन उत्पन्नामध्ये वाढ होते. फक्त मोठया शेतकऱ्यांनाच यांत्रिकीकरणाचा फायदा होऊ शकतो असा एक गैरसमज शेतकऱ्यांमध्ये असल्याचे दिसून येते. शेतीमध्ये जास्तीत जास्त उत्पन्न येण्यासाठी ज्या कमाल गरजा आहेत त्या म्हणजे पेरणीपुर्व शेतीची मशागत, वेळेवर पेरणी आणि बियांची योग्य खोलीवर पेरणी, पाणी किटकनाशक आणि खत व्यवस्थापन, पीक काढणी व मळणी मध्ये कमीत कमी नासधूस आणि वेळेत शेतीची कामे पूर्ण करणे. यासारख्या गोष्टी केवळ यांत्रिकीकरणामुळे शक्य होतात.**

**शेती कामासाठी पशुशक्ती व मनुष्य शक्तीचा वापर यापुढेही चालू राहणार आहे. परंतु या शक्ती वेळेवर शेतीची कामे पूर्ण करण्यासाठी पुरेशा नाहीत. यासाठी योग्य सुधारीत शेती अवजारे वापरणे गरजेचे आहे. सदर लेखाव्दारे महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेली सुधारित कृषि अवजारे व त्यांचा वापर आणि उपयुक्तता याबाबतची सविस्तर माहिती दिली आहे. ही माहिती शेतकऱ्यांना दैनंदिन शेती कामामध्ये सुधारित अवजारांचा वापर करतांना निश्चितच उपयुक्त ठरणारी असून त्यांचे उत्पादन खर्च कमी होऊन एकूण उत्पन्नात वाढ होण्यासाठी फायद्याची ठरेल.**

**ट्रॅक्टरचलित ज्योती बहुपिक टोकण यंत्र ठळक वैशिष्टयेः**
भुईमुग, सुर्यफुल, करडई, सोयाबीन, ज्वारी, मका, गहू,हरभरा, तुर इ. पिकांची टोकण करण्यासाठी तसेच दाणेदार खत पेरणीसाठी
पिकांच्या दोन ओळीतील अंतर २२.५, ३० किंवा ४५ से.मी. राखता येते. दोन ओळीतील अंतराप्रमाणे फणांची संख्या ५ ते ९ ठेवता येते.
३५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते.या यंत्राची प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ३.० ते ३.५ हेक्टर प्रति दिवस इतकी आहे.

**ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे तयार करणारे अवजार**
ठळक वैशिष्टयेः
३५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते. एका दिवसात ४.०० ते ४.५० हेक्टर क्षेत्रावर बंदिस्त वाफे तयार करता येतात. रब्बी ज्वारीसाठी जमीनीत पावसाचे पाणि मुरविण्यासाठी ६ मि बाय २ मि आकाराचे बंदिस्त वाफे तयार करता येतात.

**ट्रॅक्टरचलित फुले मोल नांगर**
ठळक वैशिष्टयेः
६० व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते. क्षारपड व पाणथळ जमिनीतील अतिरिक्त पाण्याच्या व क्षारांच्या निचरा करण्यासाठी उपयुक्त. मोल नांगराध्दारे दोन मोलमध्ये ४ मिटर अंतर ठेवलयास एका दिवसात २.५० हेक्टर क्षेत्रावर मोल निचरा पध्दत तयार करता येते.

**ट्रॅक्टरचलित फुले ऊस रोपे पुर्नलागवड यंत्र**
ठळक वैशिष्टयेः
४५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते.
१२० सें.मी. ते १५० सें. मी. दोन ओळीतील अंतरावर ऊस रोपांची पुनर्लागवड करण्यासाठी उपयुक्त एका दिवसात २.७५ ते ३.०० हेक्टर क्षेत्रावर ऊस रोपांची पुर्नलागवड शक्य.पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चात ६० ते ७० टक्के बचत होते. पारंपारिक पध्दतापेक्षा वेळेत ७० ते ८० टक्के वेळेची बचत

**ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो मेकॅनिक नियंत्रित तण काढणी यंत्र**
**ठळक वैशिष्टयेः** ३५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते. दोन झाडांच्या मधलया जागेतील किंवा दोन ओळीमधील तण काढण्यासाठी उपयुक्त. रोटरी युनीट दोन झाडांच्या मध्ये व बाहेर हायडो-मेकॅनिकल यंत्रनेद्वारे सहजपणे कार्य करते. एका तासामध्ये ०. १६ हेक्टर क्षेत्रावरील तण काढणी करता येते. या यंत्राच्या वापरामुळे पारंपारिक



पध्दतीपेक्षा खर्चामध्ये डाळींब बागेत ४४ टक्के व द्राक्ष बागेत ३७ टक्के बचत होते.

**ट्रॅक्टरचलित फुले कुटटी यंत्र**
ठळक वैशिष्टयेः
३५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते
फळबागेतील छाटणी नंतर पडणा-या अवशेषांची कुटी करून बेडवर दोन्ही बाजुस समांतर टाकण्याकरीता उपयुक्त. उदा- द्राक्षे अवशेषांची कुटटी करण्याकरीता ट्रॅक्टरच्या पी टी ओशक्तीचा वापर केला आहे तर कुटटी केलेलया अवशेषांची बेडवर दोन्ही बाजुस समांतर टाकण्याकरीता हायड्रोलिक शक्तीचा वापर केलेला आहे. प्रक्षेत्रीय क्षमता ७८ टक्के एका तासात ०.४७ हेक्टर क्षेत्रावर अवशेषांची कुटटी करून टाकते.
पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चामध्ये ७२ टक्के बचत.

**ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो मेकॅनिक नियंत्रित फळबाग ऑफसेट व्यवस्थापन यंत्र**
ठळक वैशिष्टयेः
३५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते.
फळबागेतील झाडांना कोणतीही इजा न होता. एकाच वेळी फळबागेतील जारवा तसेच वरंबा फोडण्यासाठी उपयुक्त. पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चात ४८ टक्के बचत. प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ०.७२ टक्के आहे.

**ट्रॅक्टरचलित फुले ॲटोमॅटिक पल्टी नांगर**
ठळक वैशिष्टयेः
४५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरनेचालवता येते.
नांगरणी करतांना कष्ट कमी करन वेळ वाचविण्याकरीता हे यंत्र उपयुक्त आहे. या नांगरांची प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ८० टक्के इतकी आहे. या नांगरासाठी हायड्रोलिक नांगरापेक्षा देखभाल व दुरुस्तीचा खर्च कमी येतो. या नांगराची किंमत हायड्रोलिक नांगरापेक्षा १५ ते २० टक्के कमी आहे.



**ट्रॅक्टरचलितफुले दोन ओळीमध्ये चालणारा फॉरवर्ड रिव्हर्स रोटाव्हेटर**
ठळक वैशिष्टयेः
४५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालवता येते.
हा रोटाव्हेटर जेव्हा पुढील दिशेने चालतो त्यावेळी आंतरमशागत होते तर विरुध्द दिशेने चालविलयास पिकास भर लावण्याचे काम होते. पिकांच्या दोन ओळीतील अंतरानुसार रुंदी समायोजित करता येते. या यंत्राने एका तासामध्ये ०.८४ हेक्टर क्षेत्रावरील आंतरमशागत / भर लावणे हि कामे केली जातात. पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चामध्ये ६२ टक्के बचत.

**ट्रॅक्टरचलित फुले सेंद्रिय भर खते देण्याचे यंत्र**
ठळक वैशिष्टये-
३० अश्वशक्तीव त्यापेक्षा जास्त ट्रॅक्टरने चालवता येते.
फळबागेला सेंद्रिय खते देण्यासाठी उपयुक्त खते देण्याचा दर कमी जास्त करता येतो प्रभावी क्षेत्रीय कार्यक्षमता ०.३३ हे. प्रति तास आणि प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ८१ टक्के आहे. पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चात ६८ टक्के बचत. या यंत्राच्या वापरामुळे मजुराची, श्रमाची वेळेची बचत होते.

**ट्रॅक्टरचलित फुले केळी खोड कुटटी यंत्र**
ठळक वैशिष्टयेः ४५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते. ङकेळीचे खोड शेतामध्ये कुटटी करण्यासाठी उपयुक्त. केळीच्या खोडाचे बारीक तुकडे केलयामुळे सेंद्रीय खत तसेच आच्छादन तयार होते. प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ०.२० हे. प्रति तास आहे. या यंत्राच्या वापरामुळे मजुराची, श्रमाची वेळेची बचत होते.

**ट्रॅक्टरचलित फुले ऊस पाने काढणी व कुटटी यंत्र**
ठळक वैशिष्टयेः १८ ते २८ अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते.
उभ्या उसाची पाने काढण्यासाठी उपयुक्त. उसाची पाने काढून त्याची कुटटी करुन टाकलयामुळे त्याचा उपयोग आच्छादान म्हणुन तसेच कंपोस्ट म्हणून देखील होतो. पिकांच्या वाढीसाठी पोषक हवा व सूर्यप्रकाश मिळतो एका तासात ०.३१ हेक्टर क्षेत्रावरील ऊसाचा पाला काढून कुटट्टी करते.
प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ८२ टक्के आहे

**विद्युत मोटारचलीत फुले औषधी वनस्पती बीया कवच फोडणी यंत्र**
ठळक वैशिष्टयेः
या यंत्राद्वारे हिरडा, बेहडा व रिठा या औषधी वनस्पतींच्या फळांचे कवच फोडता येते. एक अश्वशक्ती सिंगल फेज विद्युत मोटारचलित यंत्र कार्यक्षमता १२५ ते १५० किलो प्रति तास

**विद्युत मोटारचलीत फुले कडबा कुटी यंत्र**
ठळक वैशिष्टयेः
लहान व मध्यम शेतक-यासाठी विद्युत चलित कडबा कुटी यंत्र.
सिंगल फेज एक अश्वशक्ती विद्युत मोटार चलित यंत्र.
ओला चारा तसेच कोरडा चारा कुटटी करण्यासाठी उपयुक्त.
ओला चारा कुटटी करण्याची कार्यक्षमता
ज्वारी : ८६ टक्के मकाः ८५ टक्के ऊसः ९२ टक्के
कोरडा चारा कुट्टी करण्याची कार्यक्षमता
ज्वारीः ८६ टक्के मकाः ८१ टक्के

**विद्युत मोटारचलीत फुले ऊस बेणे तोडणी यंत्र**
ठळक वैशिष्टयेः
एक अश्वशक्तीच्या व सिंगल फेज विद्युत मोटार चलीत यंत्र एका तासात ५००० ते ६००० ऊस बेणे तयार करता येते. पारंपारीक पध्दतीपेक्षा खर्चामध्ये ८० ते ८५ टक्के बचत पारंपारीक पध्दतीपेक्षा वेळेमध्ये ८५ ते ९५ टक्के बचत ऊस रोपवाटीकेसाठी ४० ते ७० सें.मी. लांबीचे ऊस बेणे तयार करण्यासाठी उपयुक्त विद्युत मोटारचलीत फुले भुईमुग शेंगा फोडणी व प्रतवारी यंत्र
ठळक वैशिष्टये-
सिंगल फेज एक अश्वशक्ती विद्युत मोटार चलित यंत्र.
शेगा फोडणे तसेचशेंगदाणे, फुटके शेंगदाणे, शेंगा आणि टरफले वेगळे करण्यासाठी उपयुक्त शेंगा फोडणी कार्यक्षमता ९४ टक्के या यंत्राने एका तासात ६४ किलो भुईमुग शेंगा फोडणी तसेच प्रतवारी करता येते.
या यंत्राच्या वापरामुळे मजुराची, श्रमाची वेळेची बचत होते.

**मनुष्यचलित फुले शेवगा काढणी झेला**
ठळक वैशिष्टयेः
देठासहित शेंगा तोडणी करता येते.
शेंगाला इजा होत नाही.
शेवग्याच्या झाडाच्या शेंगा काढण्यासाठी
मनुष्यचलित फुले ज्वारी काढणी यंत्र उपयुक्त.
टेलिस्कोपिक पाईपमुळे झेलयाची उंची कमी जास्त करता येते.

**मनुष्यचलित फुले ज्वारी काढणी यंत्र**
ठळक वैशिष्टयेः
या अवजाराचा उपयोग ज्वारीचे ताट मुळासहित काढण्यासाठी होतो. या यंत्राद्वारे एका दिवसात ८ ते १० गुंठे ज्वारीच्या ताटाची काढणी सुलभरित्या करता येते.


लेखक - **डॉ. तुळशिदास बास्टेवाड, प्रा. एम. एम. पाचारणे,**
अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प,
डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)


# चवळी लागवड



सुधारित जाती : खरीप पिकाची काढणी झाल्यानंतर ताबडतोब जमिनीची मशागत करून चवळी लागवड केल्यास चांगले उत्पादन मिळते. लागवडीसाठी कोकण सदाबहार, कोकण सफेद, सी-१५२ या जातींची निवड करावी.
मध्यम आणि भारी जमिनीत चवळीचे चांगले उत्पादन येते. या पिकासाठी जमिनीचा सामू उदासीन असावा. पूर्व पिकाची काढणी केल्यानंतर जमीन नांगरून घ्यावी. कुळवाच्या साह्याने १ ते २ पाळया देऊन जमीन लागवडीयोग्य करावी. शेवटच्या कुळवणीवेळी हेक्टरी पाच टन शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे. शेवटी लागवडीसाठी योग्य आकाराचे सपाट वाफे तयार करावेत.
१) पेरणी १५ डिसेंबरपर्यंत पूर्ण करावी. डिसेंबरनंतर पेरणी केल्यास उत्पादनात कमालीची घट येते. प्रतिहेक्टरी २५ ते ३० किलो बियाणे लागते.
२) प्रथम प्रतिकिलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरमची प्रक्रिया करावी. बियाणे सावलीत वाळवून त्यानंतर प्रति१० किलो बियाणास रायझोबियम जीवाणू संवर्धकाची २५० ग्रॅम या प्रमाणात प्रक्रिया करावी. बियाणे सावलीत सुकवून पेरणीसाठी वापरावे. ३) पेरणी टोकण पद्धतीने किंवा पाभरीने करावी. पेरणीसाठी पसरट जातीकरिता ४५ सेंमी आणि उभट जातीकरिता ३० सेंमी अंतर ठेवावे. दोन रोपांमधील अंतर १० ते १५ सेंमी ठेवावे.
४) पाभरीने पेरणी केल्यास पेरणीनंतर १५ दिवसांनी विरळणी करून दोन रोपांमधील अंतर १० ते १५ सेंमी ठेवावे.
५) प्रतिहेक्टरी ५ टन शेणखत किंवा कंपोस्ट खताशिवाय हेक्टरी २५ किलो नत्र आणि ५० किलो स्फुरद द्यावे. खताची संपूर्ण मात्रा पेरणीवेळी द्यावी. खते ओळीमध्ये बियांखाली ५ ते ७ सेंमी खोलीवर दिल्यास पिकाची वाढ चांगली होते. खते आणि बियाणे एकाच वेळी पेरणीची सोय असलेल्या दोन चाडीच्या पाभरीच्या साह्याने दिल्यास खताचा अपव्यय टळतो.
६) उर्वरित ओलाव्यावर चवळीची लागवड ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये केली जाते. जमिनीमध्ये पाण्याचा साठा उपलब्ध असेपर्यंत पिकाची वाढ चांगली होते. परंतु, पुढे फुले येण्याचा काळ तसेच दाणे भरण्याचा आणि पक्व होण्याच्या कालावधीत पाण्याची कमतरता भासल्यास उत्पादनामध्ये कमालीची घट येते. अशा वेळेस पिकाच्या वाढीच्या महत्त्वाच्या अवस्थेमध्ये २-३ संरक्षित पाणी दिल्यास पिकाची वाढ चांगली होऊन उत्पन्न चांगले मिळते.
७) चवळीसाठी पेरणीनंतर १५ ते ३० दिवस हा तण नियंत्रणासाठी अतिमहत्त्वाचा कालावधी आहे. या कालावधीत तणांचे नियंत्रण न केल्यास उत्पन्नामध्ये १५ ते ३० टक्के घट येते. त्यासाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी कोळपणी करून ३० दिवसांनी निंदणी करावी किंवा पेरणीनंतर १५ आणि ३० दिवसांनी निंदणी करून पीक तणमुक्त ठेवावे.

**सुधारित जाती**
**अ.क्र. — जातीचे नाव — कालावधी दिवस — उत्पादन (क्विं./हे.)**
१ — कोकण सदाबहार — ६० ते ७० — १० ते १२
२ — कोकण सफेद — ९० ते ९५ — १० ते १२
३ — सी-१५२ — ९० ते १०० — १२ ते १५


**संपर्क - डॉ. नामदेव म्हसकर - ९५५२३१३४५४**
**(लेखक मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, जि. रत्नागिरी येथे कार्यरत आहेत.)**


# मोहरी लागवडीची सुधारित पद्धत

**रब्बी तेलबिया पिकांमध्ये मोहरी एक महत्त्वाचे कमी खर्चाचे व जास्त फायद्याचे पीक आहे. महाराष्ट्रातील रब्बी हंगामात असलेले १० ते ३० अंश सेल्सिअस तापमान या पिकाला पोषक आहे आणि सध्या बदलत्या वातावरणामध्ये या पिकाला भरपूर वाव आहे. मोहरी हे गहू, हरभरा आणि जवस या पिकामध्ये आंतरपीक किंवा मिश्र पीक म्हणून घेतले जाते.**

**जमिनीची निवड**
मोहरी पिकाच्या दमदार वाढीच्या दृष्टीने मध्यम ते भारी प्रकारची, पाण्याचा चांगला निचरा होणारी जमिन निवडावी. खरीप पिकाची काढणी झाल्यानंतर जमीन खोलवर नांगरून आडवी, उभी वखरणी करून जमीन चांगली भुसभुशीत करावी. ओलीताखाली पीक घ्यायचे असल्यास व वखराच्या किंवा सारा यंत्राच्या सहाय्याने सारे पाडावेत. जेणेकरून पाणी चांगले समप्रमाणात देता येते.

**वाणाची निवड व पेरणी पद्धतः**
पेरणी करिता टी ए एम - १०८ - १, शताब्दी या वाणांची निवड करावी. साधारणतः पाच ते सहा किलो प्रति हेक्टरी बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्याला ३ ग्रॅम थायरम लावावे. बियाण्याची चांगली उगवण होण्याच्या दृष्टीने पेरणीच्या आधी रात्री बियाणे ओलसर पोत्यात ठेवावे. पेरणी ऑक्टोबरचा शेवटचा पंधरवडा ते नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. पेरणी करताना दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी. ठेवावे. दोन झाडातील अंतर १० ते १५ सेंमी. राहील अशी पेरणी करावी. मोहरीचे बियाणे आकारने लहान असल्यामुळे बियाण्याच्या आकाराची वाळू समप्रमाणात मिसळून नंतर पेरणी करावी. त्यामुळे बियाणे सर्व क्षेत्रात समप्रमाणात पडेल. बियाण्याची चांगली उगवण होण्याच्या दृष्टीने पेरणी साधारणतः तीन ते चार सेंमी. खोलीवर करावी. पेरणीनंतर दहा ते बारा दिवसांनी विरळणी करावी. साधारणतः दोन झाडातील अंतर १० ते १५ सेंमी राहील या दृष्टीने विरळणी करावी किंवा खाडे भरणी करावी. म्हणजे शेतात हेक्टरी १.५ ते २.२ लाख रोपांची संख्या राहील. गव्हाबरोबर आंतरपीक ९:१ किंवा ६:१ या प्रमाणात



ओळीमध्ये पेरणी केल्यास फायदेशीर ठरते.

**खत व्यवस्थापन**
मोहरी हे पीक कोरडवाहू तसेच ओलिताची सोय उपलब्ध असल्यास ओलिताखाली सुद्धा घेता येते. ओलीताखाली हेक्टरी ५० किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद या रासायनिक खताची मात्रा द्यावी. हेक्टरी २५ किलो नत्र आणि ४० किलो स्फुरद पेरणीच्या वेळेस आणि उरलेले २५ किलो नत्र २५ ते ३० दिवसांनी म्हणजेच पहिल्या पाण्याच्या पाळीच्या वेळेस द्यावे. उत्पादन वाढीसाठी प्रती हेक्टरी २० किलो गंधक आणि १ किलो बोरॉन पेरणीच्या वेळेस द्यावे. कोरडवाहू परिस्थितीत प्रती हेक्टरी ४० किलो नत्र व २० किलो स्फुरद द्यावे. कोरडवाहू लागवडीमध्ये अधिक आर्थिक मिळकती करिता शिफारसित खत मात्रेसह ५० टक्के फुलोरा अवस्थेत १ टक्का युरियाची पिकावर फवारणी करावी.

**आंतरमशागत :** उगवणीनंतर ५० दिवसांच्या काळात पीक तणविरहित ठेवावे. पेरणी पासून २० ते ४० दिवसांनी दोन निंदण व दोन डवरणी करावी किंवा पाणी व्यवस्थापन निश्चित ओलिताची सोय असल्यास उगवणीनंतर २५ ते ३० दिवसाच्या अंतराने ओलिताच्या तीन पाळया दाव्यात. दोनच ओलीताच्या पाळया देणे शक्य असल्यास पेरणीनंतर एक महिना आणि पिक फुलोऱ्यावर असताना दुसरे ओलित करावे. एकच ओलीत करणे शक्य असल्यास पीक फुलोऱ्यावर असताना ओलीत करावे.

**काढणी व उत्पादन**
झाडावरील शेंगा ७५ टक्के पिवळया पडल्यानंतर व शेंगातील दाणे टणक झाल्यावर पीक काढणीस आले आहे असे समजावे. काढणी योग्य वेळी करावी. जमिनीलगत कापणी करून लहान ढीग करून सात ते आठ दिवस शेतातच वाळू द्यावे नंतर लगेच बैलाच्या पायाखाली तुडवून किंवा काठीने बडवून मळणी करावी. मोहरीच्या पिकापासून हेक्टरी आठ ते बारा क्विंटल उत्पादन मिळते.


**प्रा संजय बाबासाहेब बडे सहाय्यक प्राध्यापक कृषि विद्या विभाग दादासाहेब पाटील कृषि महाविद्यालय दहेगाव तालुका बैजापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर...**


थंड हवामानतील पीक

# वाटाणा लागवड तंत्रज्ञान...

वाटाणा हे थंड हवामानातील पीक असून या पिकाची महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. वाटाण्याचा उपयोग आहारात भाजी म्हणून केला जातो. वाटाण्याच्या ओल्या दाण्यांपासून भाजी आणि इतर अनेक खाद्यपदार्थ तयार करता येतात. वाटण्याचे दाणे हवाबंद करून. गोठवून किंवा सुकवून बराच काळ साठविता येतात. हिरवे ओले वाटाणे वाळवून त्यापासून डाळ बनविता येते. वाळविलेल्या अख्या वाटाण्यांचा उपयोग भाजीसाठी करता येतो. वाटाण्यामध्ये कार्बो प्रोटीन्स तसेच फॉस्फरस, पोटॅशियम, मेग्निशियम हि खनिजे आणि अ, ब, व क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात.

**हवामान व जमीन :**
वाटाणा हे थंड हवामानात वाढणारे पीक आहे. सरासरी तापमान १० ते १८ सेल्सिअस असल्यास पिकाची वाढ चांगली होते. वाटाणा पीक सर्व प्रकारच्या जमिनीत घेता येत असले तरी हलक्या जमिनीत पीक लवकर तयार होते. तर मध्यम भारी पण भुसभुशीत जमिनीत पीक तयार होण्यास जास्त कालावधी लागतो. मात्र या जमिनीत उत्पादन चांगले मिळते. वाटाण्याच्या पिकासाठी पाण्याचा निचरा होणारी, भुसभुशीत, कसदार, रेतीमिश्रित आणि ५.५ ते ६.७ सामू असलेली जमीन निवडावी.

**पूर्वमशागतः** वाटाणा हे चांगले उत्पादनशील असल्यामुळे त्याची पूर्वमशागत योग्य रीतीने करून जमीन चांगली भुसभुशीत करावी. त्यामुळे मुळया चांगल्या वाढतात आणि भरपूर अन्नद्रव्ये शोषून घेऊन झाडाची वाढ व्यवस्थित करण्यास हातभार लावतात. त्यासाठी उभी आडवी नांगरट करून २-३ कुळवाच्या पाळया द्याव्यात. ढेकळे व्यवस्थित फोडावीत व जमीन सपाट करावी. पेरणीपूर्वी पाणी देणे आवश्यक समजावे व वापसा आल्यावर पेरणी केल्यास उगवण चांगली होते.

**लागवडीचा हंगामः** महाराष्ट्रात हे पीक खरीप हंगामात जुन - जुलै मध्ये तसेच हे पीक थंड हवामानात येणारे असल्यामुळे याची लागवड ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीस किंवा नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीस करणे हितावह ठरते



**बियाणेः** लागवडीसाठी पाभरीने पेरल्यास हेक्टरी ५० ते ७५ किलो लागते. पण जर टोकण पद्धतीने लागवड केली तर हेक्टरी २०-२५ किलो बियाणे पुरेसे होते. पेरणीपूर्वी बियाण्यास प्रतिकिलो ३ ग्रॅम थायरमची बीज प्रक्रिया करावी. त्यामुळे मूळ कुजव्या टाळता येईल. त्याच प्रमाणे अनुजीवी खताचीही प्रक्रिया बियाण्यास आवश्यक आहे. रायझोबिअम कल्चर चोलल्यामुळे उत्पादनात हमखास वाढ झालेली दिसून आलेली आहे.

**प्रकार व जातीः**
लागवडीसाठी वाटाण्याचे दोन प्रकार आहेत.
१. बागायती किंवा भाजीचा वाटाणा (गार्डन पी)
२. जिरायती किंवा कडधान्याचा वाटाणा (फिल्ड पी)
बागायती वाटाण्याचे दोन गट पडतात.
१. गोल गुळगुळीत बिया असलेले - या जातीचा वाटणा सुकविण्यासाठी करतात.
२. सुरकुतलेल्या बियांचे प्रकार - या जातीच्या वाटाण्यात साखरेचे प्रमाण जास्त असल्यामुळे वाटणे गोड लागतात आणि पिठूळपणा कमी असतो. या गटातील जाती हिरवे दाणे डबाबंद करून विकाण्य्साठी, गोथावाण्यासाठी किंवा हिरव्या शेंगासाठी वापरतात.
सुधारित वाणः
अ. लवकर येणाऱ्या जाती - अर्ली बॅगर, अर्केल, असौजी, मिटीओर
ब. मध्यम कालावधीत येणाऱ्या जाती - बोनव्हिला, परफेक्शन न्यु लाईन
क. उशिराया येणाऱ्या जाती - एन. पी. - २९, थॉमस लॅक्सटन
लागवड व खते
लागवड एक तर सपाट वाफ्यात करतात. किंवा सरी व वरंब्यावर करता येते. त्यासाठी ६० सेमी अंतरावर सरी वरंबे करून सऱ्यांच्या दोन्ही अंगास बिया टोकून लागवड करावी. दोन रोपांतील अंतर ५ ते ७.५ सेमी ठेवण्याची शिफारस केली आहे. एका ठिकाणी किमान दोन बिया टोकाव्यात. काही भागात पाभरीने बी पेरून मग वाफे बांधले जातात.
वाटाणा पिकास जमिनीचा मगदूर पाहूनच खताची शिफारस केली जाते. त्यासाठी हेक्टरी १५ ते २० टन शेणखत, २० ते ३० किलो नत्र, तर ५० ते ६० किलो स्फुरद आणि ५० ते ६० किलो पालाश देणे जरुरीचे आहे. जमिनीची मशागत करीत असताना संपूर्ण शेणखत जमिनीत पसुरून



ते चांगले मिसळणे जरुरीच असते. त्याचप्रमाणे संपूर्ण पालाश आणि स्फुरद व अर्धे नत्र, बी पेरण्याचे अगोदर जमिनीत पेरावे किंवा मिसळावे. त्यातून राहिलेले नत्र ज्यावेळी पीक फुलावर येईल त्यावेळी द्यावे.

**काढणी व उत्पादनः**
लवकर येणाऱ्या जातीचे हिरव्या शेंगाचे हेक्टरी उत्पादन २५-३७ क्विंटल तर मध्यम कालावधीत तयार होणाऱ्या जातीचे उत्पादन ६५-७५ क्विंटल आणि उशिरा येणाऱ्या जातीचे ८५ ते ११५ क्विंटल येते. शेंगातील दाण्याचे प्रमाण ४० ते ४५ टक्के असते.
भरघोस उत्पादनानंतर साठवणूक हा सुद्धा महत्वाचा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. नेहमीच्या तापमानात शेंगा जास्त दिवस साठवून ठेवता येत नाहीत पण ० डिग्री से.ग्रे. तपमान व ८५ ते ९० टक्के आद्रता असल्यास हिरव्या शेंगा दोन आठवड्यांपर्यंत साठवून ठेवता येतात.


**प्रा संजय बाबासाहेब बडे सहाय्यक प्राध्यापक कृषि विद्या विभाग दादासाहेब पाटील कृषि महाविद्यालय दहेगाव तालुका बैजापूर जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे कार्यरत आहेत**

# कोटींच्या बजेटमध्ये टक्केवारीचा खेळ!

## नागरिक नमिता मुंदडामुळे विकास खुंटला

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील एकमेव आरक्षीत असणारी केज मतदार संघात महायुती कडुन पुन्हा ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विकास आठवणार्या विद्यमान आमदार नमिता मुंदडांनाच उमेदवारी देण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. स्व. विमलताई मुंदडा यांच्यापासून सुरू झालेला आमदारकीचा प्रवास फक्त विमलताई मुंदडाच्या जाण्यानंतर एकदा थांबला होता. मात्र तो नंतर अविरतपणे मुंदडा कुटुंबाचा सुरुब आहे. केज मतदार संघात मुंदडा कुटुंबाला सतत आमदारकी जरी मिळाली असली तरी केज मतदार संघातील नारिकांना काय मिळाले? केज मतदार संघाबा विकास किती झाला? हे शोधणे गरजेचे आहे. बेरोजगार तरुणांच्या हाताला काम मिळेल असा एकही प्रकल्प केज मतदार संघात उभारण्यात आलेता नाही, या मतदार संघात आम्ही मोठी बाजारपेठ निर्माण करु असे आश्वासन देणाऱ्या आ.नमिता मुंदडांना साधा गावामध्ये भरणारा आठवडी बाजार, आणी भाजीपाला विकायला बसणाऱ्या शेतकरी, व्यापाऱ्यांना आठवडी बाजारात सुविधा देता आलेल्या



नाहीत. केज मतदार संघात एम.आय.डी.सी उभारुन बेरोजगारांच्या हातांना काम देऊ आणी उद्योगांना चालना देऊ म्हणणारी थाप आनही थापच आहे. कारण अद्याप या मतदार संघात अद्यापही कुठलीच एम.आय.डि.सी कार्यान्वित नाही. ग्रामीण भागातून आलेल्या शेतकर्याला आपला भाजीपाला विकण्यासाठी साथी जागा सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आ.नमिता मुंदडा अपयशी झालेल्या आहेत. फलोत्पादन प्रकल्पाच्या जागेचा प्रश्न, ग्रामीण तथा शहरी खेळाच्या मैदानाचे प्रश्न जैसे थे आहेत. फक्त निवडणुकीच्या तोंडावर उद्घाटनाचा सपाटा सुरु करुन इतके कोटी निधी आणला,तितक्या कोटींची कामे मतदार संघात खेचुन आणली असा ढोल ताशा वाजवण्यात मात्र आ. नमिता मुंदडा यशस्वी झाल्या आहेत. असा आरोप केज मतदार संघातील मतदार करत आहेत. केज मतदार संघातील बहुतांश ग्रामीण भागातील रस्तयांची अवस्था ही रस्तयात खड्डा कि खड्डयात रस्ता, गुडघाभर खड्डे, आणी खड्डयात चिखल यातुनच आजही नागरिकांना प्रवास करावा लागत आहे. हे वास्तव आहे. केज शहरातील अतिक्रणाचा विळखा सोडवुन व्यापारी वर्गाला कायमस्वरूपी व्यवसायासाठी जागा उपलब्ध करुन देऊ असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आजही केजची बाजारापेठ अतिक्रमणाच्या विळख्यातच खितपत पडलेली दिसून येते आहे. केजकरांची तहाण भागवण्यासाठी नव्या नळ योजना आणणे तर दुरच परंतु जुन्या योजनाच सुरळीत नाहीत हे केजकरांचे दुर्दैव आहे. असे मतदार आता चर्चा करतांना दिसुन येत आहेत. झपाट्याने वाढत चाललेल्या केज मतदार संघातील नागरिकांना आपल्या मुलभूत गरजांसाठी तडफडत ठेवण्याचे पाप आ.नमिता मुंदडांनी केले आहे. असा आरोप आता दस्तुरखुद्द मतदार करत आहेत. तर दुसरीकडे हजारो कोटी निधी आणला आणी केज मतदार संघातील नागरिकांचा विकास केला असं म्हणणाऱ्या नमिता मुंदडांना तेच नागरिक आज विचारत आहेत कि, तुम्ही नेमका विकास कुणाचा केला? मतदार संघ तर विकासा पासुन आजही वंचितच आहे. मग तुमचा निधी फक्त गुत्तेदार पोसण्यात आणी त्या कामाच्या निधीतुन आपल्या पक्षाच्या बड्या नेत्याला टक्केवारी वाटण्यासाठीच होता काय ? एका एका रस्तयाच्या कामासाठी अडीच वर्षात दोनदा निधी पडले, कासारी फाटा ते विडा रस्ता आणी लोंखडी सावरगाव ते माळेगाव ही त्या दोनदा पडलेल्या निधींची मुर्तीमंत उदाहरणे आहेत, मग हे एकाच कामासाठी उचललेले निधी तुम्ही कोणाच्या पान २ वर...

## टपरीवर खुलेआम गुटखा विक्री !

### प्रश्नचिन्ह: केज पोलीसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यात सर्रास अवैध गुटखा विक्री सुरू आहे. परंतु, कारवाई केली जात नाही. या खुलेआम गुटखा विक्रीबाबत अन्न औषध प्रशासनाची 'नजर' मेल्याने गुटख्याचे अवैध विक्री चालू च आहे. जागरूक नागरिकांचे म्हणणे आहे. कि गुटखा बंद असताना हा गुटखा केज तालुक्यात येतो कुठून आणि कोणाच्या आशीर्वादाने चौका चौकातल्या टपरीवर वितरित केला जातो? तंबाखूजन्य पदार्थ गुटखा आरोग्यास हानिकारक

असल्यामुळे त्यापासून कर्करोगासारखे गंभीर आजार होतात. या पदार्थांचे सेवन करणाऱ्याला सावधानतेचा इशाराही गुटखा तंबाखूच्या पुड्यांवर नमूद केले जाते. तरुण पिढी नागरिक यापासून होणाऱ्या जीवघेण्या आजारापासून वाचावे यासाठी शासनाने यावर बंदीही घातली आहे. तरीही केज तालुक्यात सर्रास गुटखा विक्री सुरू आहे. नागरिक कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराला बळी पडू नये म्हणून गुटखा, सुगंधित तंबाखू, खर्रा आदी वस्तूंवर कायद्याने बंदी आणली होती. परंतु, त्यानंतरही केज तालुक्यात सर्रास गुटखा विक्री सुरू आहे. पण, एकाही टपरीवर प्रशासन कारवाई करीत नसल्याचेही दिसून येत आहे पान २ वर...

## गेवराईत निवडणूक वातावरण तापले!

### पडघम:विजयसिंह पंडितांचा उमेदवारी अर्ज दाखल

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातून लाडक्या बहिणींच्या प्रमुख उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. कोणताही बडेजावपणा न करता त्यांनी अतिशय सध्या पद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने अर्ज दाखल केला आहे. लाडक्या बहिणींचा आशीर्वाद आपल्या पाठीशी असल्यामुळे आपला विजय निश्चित असल्याची प्रतिक्रिया यावेळी त्यांनी दिली. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत आहे. यावेळी उपस्थित मतदार, कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी




विजयसिंह पंडित यांना शुभेच्छा दिल्या. गेवराई विधानसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी आपला उमेदवारी अर्ज गुरुवार दि.२४ ऑक्टोबर रोजी गुरु पुष्यामृत मुहूर्तावर लाडक्या बहिणींच्या उपस्थितीमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी सतीश धुमाळ यांच्याकडे दाखल केला. यावेळी लाडक्या भगिनींच्या प्रतिनिधी म्हणून सौ. वैशालीताई कांडेकर, सौ. मीनाताई पान २ वर...

## नागरिकांनी आक्षेपार्ह पोस्ट करु नये

### सपोनि सोमनाथ नरके : निवडणूकीमुळे पोलीस अलर्ट

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील सुजाण नागरिकाना आव्हान करण्यात येत आहे की निवडणुकीच्या काळामध्ये सुजाण नागरिकांनी आक्षेपार्ह पोस्ट करू नये असे आवाहन तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि सोमनाथ नरके यांनी केले आहे.

तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व नागरिकांना महत्त्वाच्या सूचना सपोनि सोमनाथ नरके यांच्याकडून निवडणुकीच्या काळात सुजान नागरिकांनीकोणत्याही



उमेदवाराची,व्यक्तीची किंवा कुटुंबीयांची सामाजिक स्तरावर अवहेलना होईल, अशी आक्षेपार्ह टीका टिप्पणी पान २ वर...

## ...तोपर्यंत मैदान सोडणार नाही

### निर्धार:लक्ष्मण पवारांनी जाहीर केली भूमिक

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई मतदारसंघातून, जो पर्यंत पंडितांची जुलूमशाही संपत नाही. तो पर्यंत , मैदान सोडणार नाही. विकास कामाच्या माध्यमातून जनतेसमोर जाणार असून, मतदारसंघातील माझ्या कार्यकर्त्यांच्या जीवावर अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार असून, काहीही झाले तरी, मागे हटणार नाही. अशी घोषणा आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे बोलताना केली आहे.

गेवराई मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण पवार यांनी गुरूवार ता. २४ रोजी सकाळी अकरा वाजता कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अपक्ष निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले.



यावेळी, कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा करून, परिसर दणाणून सोडला. बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे आणि बीडच्या भाजपाने जाणीवपूर्वक डावलून विकासात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आ. पवार यांनी केला होता. त्यानंतर त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. महाविकास आघाडीकडून त्यांना तिकिट मिळणार असल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून माजी मंत्री बदामराव पंडित यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे,आमदार पवार यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले होते. गुरूवार ता. २४ रोजी आमदार पान २ वर...

## तिरुपती हॉस्पिटलमध्ये जन आरोग्य योजना

### डॉ गोविंद लोंडगुळे : गेवराई तालुक्यातील



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात तिरुपती हॉस्पिटल ब्लड बँक व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना तिरुपती हॉस्पिटल मध्ये सुरू होतात २४ तासात दोन शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे.महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना सुरू झाली आहे. तसेच आयुष्यमान कार्ड धारकांना सुद्धा या योजनेचा लाभ घेता येत आहे. तालुक्यातील ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांसाठी शासनाने सुरू केलेल्या जन आरोग्य योजना ही सर्वसामान्य साठी योगदान ठरत आहे. पान २ वर...

## केजला पुन्हा अतिक्रमणाचा विळखा !

### दुर्लक्ष:प्रशासनाने लक्ष देण्याची नितांत गरज




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या पाच सहा महिन्या पुर्वी प्रशासनाने मनावर घेऊन केज शहरातील अतिक्रमण काढले होते संपुर्ण शहराने त्या वेळेस मोकळा श्वास घेतला होता. केजचे तत्कालीन तहसीलदार अभिजित जगताप व पोलीस उपधिक्षक पंकज कुमावत यांनी स्वःता जातीने लक्ष देऊन केज शहर अतिक्रमण मुक्त केले होते. त्याच्यात नगरपंचायत ने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला होता पण त्यांनी तो धुडकावून लावत सगळे अतिक्रमण उठवले होते. पण सध्या पुन्हा अतिक्रमण जैसे थे झाले आहे. त्या कडे प्रशासन डोळे झाक करत असल्याने केज शहर व तालुक्यातील शहरात येणाऱ्या लोकांचे चलने मुश्किल झाले आहे. फलोत्पादनाच्या (जिरायतखाते) जागेतील अतिक्रमण काढले की तेथील टपरी धारक पुन्हा पुन्हा अतिक्रमण करतात व पहिल्या पेक्षा मोठी जागा धरतात व पत्र्याचे मोठ मोठे गाळे करतात तर एका बाजूस फळ विक्रेत्याकडून (बागवान) मंडळींकडून ऐन रस्त्यावर फळाचे गाडे लावल्या मुळे पुर्ण महामार्ग वर अडथळे निर्माण झाले आहेत त्यातच दिपावली सारखा मोठा सण जवळ आल्याने खरेदी साठी लोक घराच्या बाहेर पडत आहेत त्या मुळे चारचाकी, दोनचाकी पान २ वर...

## वारसांना चार लाखांचा धनादेश

### दिलासा: प्रशासनाकडून धनादेशाचे वाटप



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील हनुमंतखेडा व बोरमाळ तांडा येथील दोघे अविवाहित अजय राठोड(रा बोरमाळ तांडा वय १८) व अश्विनी राठोड(रा.बोरमाळ तांडा वय १५) शेतात कापूस वेचणी करून झाडाखाली जात असताना मृत झाल्या ची घटना सोमवारी (ता.२१) सायंकाळी चार वाजेच्या सुमारास घडली होती या मृतांच्या वारसांना तातडीने मदत देण्यासाठी सरपंच जीवन राठोड व सदाशिव राठोड यांनी जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा पान २ वर...

## सवाल केवायसीसाठी शंभर रुपये का घेता?

# रेशन दुकानदारांना आले सुगीचे दिवस!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील रेशन दुकानदार मनमानी कारभार करतायत असा प्रश्न उपस्थित केला जात आहे कारण रेशनकार्ड धारकांची केवायसी करण्यासाठी राशनकार्ड धारका कडुन शंभर रुपये घेतले जात आहे परंतु रेशनकार्ड धारकांन काडुन शंभर रुपये घेण्याचा कुठल्याही प्रकारचा निर्णय घेतला गेला नाही किंवा पत्रक नाही परंतु रेशन दुकानदार शंभर रुपये घेत आहेत प्रत्येक रेशनकार्ड धारकांना कडुन शंभर रुपये म्हणजे लाखो रुपये प्रत्येक गावातुन लुट केली जात आहे अशा प्रकारे होनारी लुट केज तहसीलदार साहेब यांनी लक्ष घालुन बंद केली पाहिजे अन्यथा राशन दुकानदार आरामात ग्राहकांची लुट करुन स्वाताची खळगी भरल्या शिवाय राहणार नाहीत एक रेशन दुकानदार आरामात हजारो रुपये काळाबाजार करुन लखपती होतील तरी केज तहसीलदार साहेब यांनी तात्काळ अशी मनमानी लुट करणाऱ्या रेशन दुकानदारावर कार्यवाही केली पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

केज तालुक्यातील राशनकार्ड धारका कडुन केवायसी करण्यासाठी शंभर रुपये घेण्याचा कुठल्याही प्रकारचा नियम नाही तरी कुणीही शंभर रुपये रेशनकार्ड केवायसी करण्यासाठी देऊ नये असे मत दैनिक पुण्यभूमी प्रतीनीधीनी संपर्क केला असता केजचे तहसीलदार साहेब यांनी प्रतिक्रिया दीली आहे.




## सुख,शांतीचा मार्ग दाखविणार

### डॉ. विश्वनाथ कराड: ग्रंथ प्रकाशन समारंभ



पुणे /पुण्यभूमी प्रतिनिधी

स्वामी विवेकानंद यांनी सांगितल्यानुसार भारत माताच संपूर्ण जगाला सुख, समाधान आणि शांतीचा मार्ग दाखविणार आहे. विज्ञान आणि आध्यात्माची सांगड घालून एमआयटी संस्थेत विद्यार्थ्यांना मूल्याधिष्ठित शिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे. तसेच येथे विद्यार्थ्यांच्या चारित्र्य निर्मितीवर अधिक भर दिला जातो. असे विचार एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले.

तामिळनाडूच्या कोयंबटूर मधील कुमारागुरू संस्थेच्या वतीने कुमारागुरू फाउंडेशन डे आणि अरूचेलवर यांच्या जन्म शताब्दी निमित्त कुमारागुरू संस्थेच्या वतिने तयार करण्यात आलेल्या ग्रंथाचे प्रकाशन गुरूवारी एमआयटी डब्ल्यूपीयूत संस्थेचे संस्थापक पान २ वर...